जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेला 'सहकार गौरव पुरस्कार'

### उत्कृष्ट कामकाज, प्रभावी वसुली, कमी थकबाकी आणि योग्य नियोजनाची दखल


भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेला प्रदान करण्यात आलेला 'सहकार गौरव पुरस्कार' स्विकारताना पतसंस्थेचे भानुदास कोतकर आदी.

नगर – संस्थेचे उत्कृष्ट कामकाज, कर्जवसुलीचे योग्य प्रमाण, कमी थकबाकी, प्रभावी नियोजन, संचालक मंडळाचा सक्रिय सहभाग आणि संस्थेने निश्चित केलेली उद्दिष्टे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेला 'सहकार गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

नाशिक विभागातील नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि., अहिल्यानगर, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन तसेच अहिल्यानगर जिल्हा व अहिल्यानगर तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. जिल्हा उपनिबंधक व नगर तालुका उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने नगर शहर व तालुक्यातील पतसंस्थांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

अहिल्यानगर येथील एडीसीसी बँकेच्या चहुराणा शाखेतील कै. आमदार शिवाजीराव कर्डिले सभागृहात हा पुरस्कार सोहळा झाला. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या हस्ते झाले. पतसंस्थेच्या कामकाजामध्ये आर्थिक शिस्त, कर्जवसुली, थकबाकी नियंत्रण, सभासदांशी सातत्यपूर्ण संपर्क, योग्य आर्थिक नियोजन आणि संचालक मंडळाचा सक्रिय सहभाग या बाबींना विशेष महत्त्व असते. या सर्व बाबींमध्ये भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन संस्थेला 'सहकार गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

पुरस्कार प्रदान करताना आयोजकांकडून संस्थेच्या कार्याचा गौरव करताना, महाराष्ट्राच्या भूमीत सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात आपण करीत असलेले कार्य अलौकिक व दैदिप्यमान आहे, अशा शब्दांत संस्थेच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार वितरण प्रसंगी मंगेश सुरवसे (जिल्हा उपनिबंधक, अहिल्यानगर), वसंत लोढा (अध्यक्ष), काका कोयटे (अध्यक्ष, FCOCS), गोपाळ पाटील (उपाध्यक्ष) आणि वसंत कवड (कार्याध्यक्ष) आदी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे संस्थापक भानुदास कोतकर यांनी संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि सभासदांचे अभिनंदन केले. संस्थेवर सभासदांनी दाखविलेला विश्वास, कर्मचारी वर्गाचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि संचालक मंडळाचे योग्य मार्गदर्शन यामुळेच ही कामगिरी शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

## जोखीम समजून घेतल्याशिवाय गुंतवणुकीचा निर्णय पूर्ण होत नाही


राजन कुटे

गुंतवणूक करताना आपण अनेकदा परताव्याबद्दल विचार करतो. किती मिळू शकतं, किती काळात मिळू शकतं, कोणती योजना चांगली आहे, सध्या बाजाराची परिस्थिती कशी आहे– असे अनेक प्रश्न आपल्या मनात असतात. पण या सगळ्याआधी एक महत्त्वाची बाब समजून घेणं गरजेचं आहे–आपण किती जोखीम स्वीकारू शकतो आणि प्रत्यक्षात किती जोखीम पेलू शकतो. इथे Risk Profiling महत्वाचं ठरतं.

Risk Profiling म्हणजे केवळ एखादा फॉर्म भरून गुंतवणूकदाराला 'कमी', 'मध्यम' किंवा 'जास्त' जोखीम घेणारा ठरवणं नव्हे. त्यामागे गुंतवणूकदाराची आर्थिक परिस्थिती, उद्दिष्टं, गुंतवणुकीचा कालावधी, उत्पन्नाची स्थिरता, भविष्यातील पैशांची गरज आणि बाजारातील चढ–उतार सहन करण्याची मानसिक तयारी या सगळ्यांचा विचार असतो.

समजा, दोन व्यक्तींकडे प्रत्येकी ₹५० लाख गुंतवण्यासाठी आहेत. दोघांनाही चांगला परतावा हवा आहे आणि बाजारातील चढ–उतार चालतील असं ते सांगतात. वरवर पाहता त्यांची परिस्थिती सारखी वाटू शकते. पण त्यातील एका व्यक्तीला पुढील दोन वर्षांत घरासाठी मोठी रक्कम लागणार असेल आणि दुसऱ्या व्यक्तीला त्या पैशाची दहा वर्षे गरज नसेल, तर दोघांसाठी एकच गुंतवणूक रचना योग्य ठरेलच असं नाही.

म्हणजेच, जोखीम ही गुंतवणुकीपासून स्वतंत्र गोष्ट नाही; ती आपल्या आयुष्याशी जोडलेली असते.

एखाद्या गुंतवणुकीत तात्पुरती २० टक्के घसरण झाली, तर कागदावर दिसणारा तोच तोटा दोन वेगवेगळ्या व्यक्तींवर वेगळा परिणाम करू शकतो. एका व्यक्तीला दीर्घ कालावधी असल्यामुळे शांत राहता येईल. दुसऱ्याला त्याच वेळी पैशांची गरज असल्यामुळे गुंतवणूक तोट्यात विकावी लागू शकते.

म्हणून केवळ मला किती जोखीम चालते? हा प्रश्न पुरेसा नसतो. माझी आर्थिक परिस्थिती किती जोखीम पेलू शकते? हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा असतो. त्यासोबतच, आपल्या उद्दिष्टासाठी किती जोखीम खरंच आवश्यक आहे, हेही पाहणं गरजेचं असतं.

याच कारणामुळे Risk Profiling चा परिणाम थेट गुंतवणुकीच्या निर्णयावर झाला पाहिजे. कोणत्या मालमत्तेत किती गुंतवणूक करायची, किती पैसा तुलनेने स्थिर ठेवायचा, किती रक्कम दीर्घकालीन वाढीसाठी ठेवायची आणि कोणत्या पैशाला बाजारातील चढ–उतार पासून दूर ठेवायचंच्या निर्णयांना Risk Profiling मुळे संदर्भ आणि दिशा मिळते.

कधी कधी गुंतवणूकदाराला जास्त परताव्याची इच्छा असते, परंतु त्यासाठी लागणारी जोखीम स्वीकारण्याची मानसिक तयारी नसते. कधी उलट परिस्थिती असते–जोखीम घेण्याची मानसिक तयारी असते, पण आर्थिक परिस्थिती तितकीशी परवानगी देत नसते. या दोन्ही गोष्टींमधला फरक समजून घेणं महत्त्वाचं ठरतं.

Risk Profiling चा खरा उपयोग इथेच दिसतो. ते आपल्याला एखादी गुंतवणूक चांगली आहे की वाईट, एवढंच सांगत नाही. त्याऐवजी, ही गुंतवणूक माझ्या परिस्थितीत योग्य आहे का? हा अधिक महत्त्वाचा प्रश्न विचारायला लावते.

गुंतवणुकीचा निर्णय हा केवळ परताव्याचा निर्णय नसतो. तो आपल्या पैशाचा, आपल्या उद्दिष्टांचा, आपल्या वेळेचा आणि आपल्या जोखीम पेलण्याच्या क्षमतेचा एकत्रित निर्णय असतो.

म्हणूनच गुंतवणूक सुरू करण्यापूर्वी स्वतःला समजून घेणं हे एखादी योजना निवडण्याइतकंच महत्त्वाचं आहे. कारण योग्य गुंतवणूक तीच, जी फक्त कागदावर योग्य दिसत नाही; तर आपल्या आयुष्यातही योग्य ठरते.

जोखीम किती आहे हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे; पण ती जोखीम आपल्या आयुष्याशी जुळते का हे समजून घेणं त्याहून महत्त्वाचं आहे.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

## साताळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जिल्ह्यातील 'पहिले किडनी ट्रान्सप्लांट युनिट' सुरु


साताळकर हॉस्पिटलमधील किडनी ट्रान्सप्लांट युनिटचे उद्घाटन करताना तारकेश्वर गडाचे मठाधिपती ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री आणि डॉ. सुजाता पटवर्धन. समवेत आ. संग्राम जगताप, डॉ. भगवान कलानी आदी.

नगर – अत्याधुनिक वैद्यकीय उपचार आणि प्रगत शस्त्रक्रिया सुविधा अहिल्यानगरकरांच्या सेवेत उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत येथील साताळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये २६ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील पहिल्या किडनी ट्रान्सप्लांट युनिटचा शुभारंभ करण्यात आला.

या नवीन युनिटमुळे किडनीच्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना उपचारासाठी आता मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज उरलेली नाही. या नव्या वैद्यकीय सेवेच्या शुभारंभास मुंबईतील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज व केईएम हॉस्पिटलच्या युरोलॉजी विभागाच्या प्रमुख आणि वेस्ट झोन युरोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाच्या प्रेसिडेंट डॉ. सुजाता पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्याच हस्ते या युनिटचे उद्घाटन झाले. याप्रसंगी तारकेश्वर गडाचे मठाधिपती ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री आणि आमदार संग्राम जगताप, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. भगवान कलानी, केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, रोहन सानप, किडनी ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर दलीप सिंग आणि जावेद शेख आदी उपस्थित होते.

आभार डॉ. रविंद्र साताळकर यांनी मानले. लेझर किडनी स्टोन, लेझर प्रोस्टेट सर्जरी तसेच महिलांच्या विविध शस्त्रक्रियांमध्ये प्रभावी उपचार देणाऱ्या या हॉस्पिटलने यापूर्वीच एसएसआय मंत्राचे अहिल्यानगरमधील पहिले रोबोटिक सर्जरी सेंटर सुरू केले असून याद्वारे अत्यंत कमी कालावधीत ५० रोबोटिक सर्जरी पूर्ण करण्याचा टप्पाही गाठला आहे. पोटातील आजार, गर्भाशय, पोटाचा कॅन्सर, लेझर प्रोस्टेट, किडनी कॅन्सर, हर्निया आणि पित्ताशय यांसारख्या विविध गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आता येथे रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अचूकपणे केल्या जात आहेत. या सर्व आधुनिक वैद्यकीय सेवांच्या विस्तारात डॉ. हर्षवर्धन तनवर, डॉ. सुदर्शन डागा, आणि डॉ. मुग्धा तन्वर यांचे विशेष योगदान लाभले.

यावेळी बोलताना डॉ. हर्षवर्धन तनवर म्हणाले की, अहिल्यानगरमध्ये जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, अत्याधुनिक रोबोटिक सर्जरीनंतर आता किडनी ट्रान्सप्लांटची सुविधा सुरू करणे हा आमच्या प्रवासातील एक मैलाचा दगड ठरला आहे.

तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर सुरू झालेल्या या सुविधांमुळे अहिल्यानगरच्या आरोग्यसेवेत एका नव्या व आधुनिक अध्यायाची सुरुवात झाली असून सर्वत्र त्याचे स्वागत होत आहे.

## बाबुर्डी बेंद ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिल्पा चोभे



नगर – नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी शिल्पा शरद चोभे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच मंदाताई सुनील खेंगट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत शिल्पा चोभे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी माजी उपसरपंच भाऊसाहेब चोभे, वंदना भाऊसाहेब निमसे, हिराबाई अशोक चोभे, विजय वाळके आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका लावण्या डोन्टा यांनी निवड प्रक्रियेचे कामकाज पाहिले. निवडीनंतर नूतन उपसरपंच शिल्पा चोभे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गावचे लहुकुमार चोभे, खंडेश्वर सहकारी संस्थेचे चेअरमन शरद चोभे, व्हाईस चेअरमन लहू कासार, अंबादास साठे, भाऊसाहेब निमसे, वैभव खेंगट, आण्णा चोभे, बाळासाहेब खेंगट, विकास चोभे, अक्षय खेंगट, आकाश चोभे, श्रीनाथ खेंगट, सागर चोभे मेजर आदी उपस्थित होते.

शिल्पा चोभे यांच्या बिनविरोध निवडीमुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

नूतन उपसरपंच शिल्पा चोभे यांनी ग्रामस्थांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानत गावाच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका व्यक्त केली.

## श्री संत माऊली पतसंस्थेत अडकले १.२९ कोटी अन् ५५ तोळे सोने; ठेवीदारांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



नगर – श्री संत माऊली मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या तेलकुडगाव व देडगाव येथील ठेवीदारांचा संताप उफाळून आला आहे. आपल्या १ कोटी २९ लाख रुपयांच्या ठेवी आणि ५५ तोळे सोने परत मिळण्यासाठी ठेवीदारांनी थेट पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेत कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीचे तपास करण्याचे निर्देश दिले आहेत.

याबाबत ठेवीदारांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, संस्थेचे चेअरमन सुनील बाबासाहेब शिरसाठ व इतर संचालकांनी संगनमत करून ठेवीदारांच्या रकमा बुडवल्या असून, याप्रकरणी ९ सप्टेंबर २०२६ रोजी पाथर्डी व नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, गुन्हा दाखल होऊनही तपासाला अपेक्षित वेग मिळत नसल्याने ठेवीदारांमध्ये संताप पसरला आहे. संबंधित दोषींवर महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियमअंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी. दोषींच्या मालमत्ता जप्त करून, कायदेशीर प्रक्रियेद्वारे त्यांचा लिलाव करावा आणि त्यातून ठेवीदारांचे पैसे व सोने परत मिळवून द्यावे, प्रकरणाचा तपास वेगाने करून दोषींवर फौजदारी कारवाई व्हावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना या प्रकरणात तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता पोलीस तपासाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून लवकरात लवकर ठोस कारवाई झाली नाही, तर मुंबईत जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचा इशारा ठेवीदारांनी दिला आहे. तसेच, न्याय न मिळाल्यास देडगाव येथील पतसंस्थेसमोर आमरण उपोषण करत आंदोलन तीव्र करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला आहे.

या निवेदनावर सरपंच सतीश काळे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष आकाश चेडे, डॉ. गणेश मुंगसे, सुदाम काळे, अरुण वांढेकर, प्रदीप कदम, अशोक काळे, पांडुरंग पा. रक्ताटे, बाळासाहेब मुंगसे, बाबासाहेब देशमुख, माऊली सरोदे, विठ्ठलभाऊ काळे, रवींद्र भनगे, संभाजी जवरे (खरवंडी), सुनील मुथ्था, बंडू मच्छिंद्र मुंगसे, काका मुंगसे, भाऊराव म्हस्के आणि अजित बनसोडे यांच्यासह तेलकुडगाव व देडगाव येथील शेकडो ठेवीदार उपस्थित होते. यासंदर्भातील निवेदनाच्या प्रती यापूर्वीच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, जिल्हा उपनिबंधक तसेच नेवासा तहसीलदारांनाही देण्यात आल्या आहेत.

## नगर–सोलापूर रोडवर अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर – सोलापूर रोडवरील घोगरगाव गावाच्या बाहेरील भागात, मिरजगाव एम.के. हॉटेलसमोर रस्ता क्रॉस करत असताना झालेल्या भीषण अपघातात भाऊसाहेब सुपेकर (रा. कुळधरण, सुपेकरवाडी) यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २५ सप्टेंबर रोजी रात्री घडली.

भाऊसाहेब सुपेकर हे आपल्या हिरो होंडा कंपनीच्या दुचाकीवरून प्रवास करत होते. घोगरगावच्या बाहेर मिरजगाव एम.के. हॉटेलसमोर ते रस्ता ओलांडत असताना त्यांना बोलेरो (एमएच–१५, सीटी–४२७१) वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन ती अक्षरशः चक्काचूर झाली. अपघातानंतर दुचाकीची ओळख पटविणेदेखील कठीण झाले होते. अपघात घडताच घटनास्थळी उपस्थित स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि नागरिकांच्या मदतीनेच मृत व्यक्तीची ओळख भाऊसाहेब सुपेकर अशी पटविण्यात आली. या अपघातामुळे नगर–सोलापूर मार्गावरील वाहतूक काही विस्कळीत झाली होती. पुढील तपास कर्जत पोलीस करीत आहेत.

## मराठा सेवा संघ व पतसंस्थेचे २७ सप्टेंबरला पुरस्कार वितरण

नगर – अहिल्यानगर मराठा सेवा संघ व अहिल्यानगर मराठा पतसंस्थेच्या वतीने दरवर्षी समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाज भूषण पुरस्कार व युवा उद्योजकांना युवा उद्योजक पुरस्कार देण्यात येतो. त्याचे वितरण २७ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती इंजी. प्रवीण दहातोंडे व इंजिनिअर विजयकुमार ठुबे यांनी दिली. या कार्यक्रमात सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन पतसंस्थेचे उपाध्यक्ष उदय अनभुले, गुण गौरव सोहळ्याचे प्रमुख संचालक किशोर मरकड, उत्तर जिल्हाध्यक्ष इंजिनियर विवेक लव्हाट यांनी केले आहे.

## अहिल्यानगर शहरात २७ सप्टेंबर रोजी मोफत गरबा–दांडिया प्रशिक्षण आयोजन

नगर – नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ॲपॉस्ट्रॉफी नृत्य अकादमीच्या वतीने अहिल्यानगरकरांसाठी मोफत गरबा–दांडिया प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत नगर–मनमाड रस्त्यावरील बंधन लॉन्स येथे ही कार्यशाळा होणार आहे.

या कार्यशाळेत गरबा, दांडिया, डोडिया, तीन ताली, चार ताली यांसह विविध आकर्षक गरबा नृत्यप्रकारांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. नवशिक्यांसह गरबा–दांडियाची आवड असलेल्या सर्व वयोगटातील नागरिकांना यामध्ये सहभागी होता येणार आहे.

यानंतर २८ सप्टेंबरपासून ११ दिवसांची विशेष गरबा–दांडिया प्रशिक्षण कार्यशाळा सुरू होणार असून त्यासाठी केवळ ४०० रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. सहभागी प्रशिक्षणार्थींना छायाचित्रण, चित्रिकरण, नृत्य सादरीकरणाची संधी तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहन अकादमीचे संस्थापक तथा नृत्यदिग्दर्शक अभिजीत शिर्के यांनी केले आहे.

संपर्क : ८३०८८८२९६८ / ८२०८९५९८५३

## रमेश भुसा यांचे दु:खद निधन



नगर – येथील श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुपचे सचिव रमेश गोविंदराव भुसा (वय ७०) यांचे २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता दुःखद निधन झाले. यांच्या पश्चात पत्नी, ३ मुली, नातवंडे असा परिवारा आहे. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यविधी करण्यात आला. पद्मशाली समाजातील फोटोग्राफर सुरेश भुसा यांचे ते मोठे बंधू होत.

## अजय साळवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – निलक्रांती चौक, नालेगाव येथील रहिवासी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, माजी नगरसेवक अजय सुधाकर साळवे (वय ५९) यांचे २५ सप्टेबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. निखिल, रविराज व राहुल यांचे ते वडील होत. अहमदनगर नगरपालिकेमध्ये आरोग्य समितीचे ते माजी सभापती होते.

## चेन्नई मार्गावर अपघात; अहिल्यानगरमधील २ जणांसह चौघांचा मृत्यू


किरण जगदाळे (मयत)


नवनाथ गायकवाड (मयत)


विशाल शेडगे (मयत)


चेन्नई–बंगळूरू द्रुतगती महामार्गावर अपघातग्रस्त कार.

नगर – चेन्नई–बंगळूरू द्रुतगती महामार्गावर २५ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण कार अपघातात महाराष्ट्रातील श्रीगोंदा तालुक्यातील दोन युवा उद्योजकांसह चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. तिरुपती बालाजीचे दर्शन घेऊन पुण्याकडे परतत असताना बंगारपेटजवळील मारगल येथे हा अपघात घडला. या घटनेमुळे श्रीगोंदा तालुक्यातील अजनुज गावावर शोककळा पसरली आहे.

या अपघातात युवा उद्योजक किरण बाळासाहेब जगदाळे (वय ३६, अजनुज, श्रीगोंदा) व नवनाथ गोरख गायकवाड (वय ३४) – अजनुज, श्रीगोंदा) तसेच विशाल अशोक शेडगे (वय ४६, रा. राजळे फलटण), कार चालक विश्वनाथ दिगंबर पवार (वय ३४, रा. नांदेड) या चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातात सोमनाथ कोल्हे (वय ५३) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने कोलार तालुका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्वजण तिरुपती बालाजीचे दर्शन घेऊन बंगळूरू मार्गे पुण्याच्या दिशेने निघाले होते. दरम्यान, बंगारपेटजवळील मारगलजवळ भरधाव वेगात असलेल्या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्यामुळे गाडी दुभाजकाला (डिव्हायडर) धडकली आणि अनेक वेळा उलटली. धडक इतकी भीषण होती की कारमधील चार जणांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच केजीएफचे पोलीस अधीक्षक शिवांशू राजपूत आणि पोलीस निरीक्षक रविकुमार यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बंगारपेट पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, मृतदेह शवविच्छेदनासाठी तालुका रुग्णालयात पाठवण्यात आले. शवविच्छेदन झाल्यानंतर चौघांचेही मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

या अपघातात प्राण गमावलेले युवा उद्योजक किरण बाळासाहेब जगदाळे आणि नवनाथ गोरख गायकवाड यांच्यावर २६ सप्टेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता अजनुज येथील भीमा नदीच्या तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत किरण जगदाळे यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे. नवनाथ गायकवाड यांच्या मागे आई, वडील, पत्नी, भाऊ, भावजई, एक मुलगा, मुलगी असा परिवार आहे. विशाल शेडगे यांच्या मागे आई, वडील, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. तर पवार यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, भावजई असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### बैठे काम करत असाल तर...

सकाळी नऊ ते संध्याकाळी पाचपर्यंत खुर्चीला खिळून काम करणाऱ्यांची सगळ्यात मोठी तक्रार म्हणजे संध्याकाळी मान जड होणे, खांदे दुखणे आणि कंबर आखडणे. याचे मुख्य कारण म्हणजे आपण तासनतास एकाच पोझिशनमध्ये बसतो आणि रक्ताभिसरण मंदावते. दर दोन तासांनी फक्त पाच मिनिटे काढून हे पाच सोपे व्यायाम केल्यास तुम्हाला लगेच आराम मिळेल. पहिला व्यायाम आहे मानेचा, दोन्ही हात मांडीवर ठेवा आणि मान हळूवारपणे उजवीकडे वळवून पाच सेकंद थांबा, नंतर डावीकडे, हा व्यायाम मानेचा ताण पूर्णपणे काढून टाकतो. दुसरा व्यायाम खांद्यांसाठी आहे, दोन्ही खांदे कानापर्यंत उंच उचला आणि पाच सेकंद ताणून ठेवा आणि मग एकदम सोडून द्या, असे चार ते पाच वेळा केल्याने खांद्यात साचलेला तणाव निघून जातो. तिसरा सर्वात महत्त्वाचा व्यायाम आहे कंबर आणि पाठीसाठी, याला चेअर ट्विस्ट म्हणतात, खुर्चीवर बसूनच तुमचे शरीर उजवीकडे वळवा आणि खुर्चीचा हात पकडा आणि पाच सेकंद थांबा, तसेच डावीकडे करा, यामुळे मणक्याला आलेली बाकी निघून जाते. चौथा व्यायाम आहे हात आणि मनगटासाठी, दिवसभर कीबोर्डवर काम करून हात दुखत असतील तर दोन्ही हात समोर सरळ करा आणि बोटे तुमच्या दिशेने ओढा, यामुळे मनगटाच्या नसा मोकळ्या होतात. लक्षात ठेवा हे व्यायाम करताना श्वास रोखू नका आणि झटका देऊ नका.

## पाककला

### सांबार

**साहित्य** : तूर डाळ १ वाटी, लहान कांदे ८ ते १०, टोमॅटो १ मोठा, शेवग्याच्या शेंगा २, भोपळ्याचे तुकडे १/२ वाटी, वांग्याचे तुकडे १/२ वाटी, चिंच १, सांबार पावडर २ चमचे, हळद १/४ चमचा, गूळ १ छोटा खडा, मीठ चवीनुसार, कोथिंबीर १ चमचा बारीक चिरलेली, तेल २ चमचे, फोडणीसाठी मोहरी १/२ चमचा, जिरे १/४ चमचा, हिंग १/४ चमचा, कडीपत्ता ८ ते १० पाने, सुक्या लाल मिरच्या २

**कृती :** तूर डाळ धुवून त्यात हळद घालून कुकरमध्ये ३ शिट्ट्या करून मऊ शिजवून घ्या. चिंच कोमट पाण्यात १० मिनिटे भिजवून कोळ काढून घ्या. एका पातेल्यात तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग, कडीपत्ता आणि सुक्या मिरच्या घालून फोडणी करा. त्यात लहान कांदे, टोमॅटो, शेवग्याच्या शेंगा आणि इतर भाज्या घालून २ मिनिटे परता. त्यात सांबार पावडर, मीठ घालून मिश्रण एकजीव करा. भाज्या अर्धवट शिजल्यावर त्यात चिंचेचा कोळ, गूळ आणि थोडे पाणी घालून उकळी येऊ द्या. तयार भाजीच्या मिश्रणात घोटलेली तूर डाळ घालून जाडसर थर येईपर्यंत पसरा. त्यावर गरजेनुसार पाणी घाला. मध्यम आचेवर ७ ते ८ मिनिटे खरपूस उकळी येईपर्यंत शिजवा. तयार सांबारवर बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. गरमागरम सांबार इडली, डोसा, राईस, मेदू वड्याबरोबर गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### बाल्कनी नसेल तर...

* ज्या बाजूला बाल्कनी असायला हवी होती, त्या भिंतीजवळचा ईशान्य कोपरा अजिबात जड सामानाने भरू नका.

* तिथे हलका पडदा, आरसा किंवा पांढऱ्या रंगाचा दिवा लावा. त्यामुळे प्रकाशाचा आभास निर्माण होतो. बाल्कनी नसली तरी खिडकीच्या आतल्या बाजूला छोटी तुळस किंवा मनी प्लांट लावा.

## सौंदर्य

झोपण्यापूर्वी २ मिनिटे खोबरेल तेल कापसावर घ्या आणि हळुवारपणे मेकअप पुसून टाका. नंतर साध्या पाण्याने चेहरा धुवा. महागड्या रिमूव्हरचीही गरज नाही.

## सल्ला

डाळ उकळायला ठेवल्यावर पहिली उकळी आल्यावर वर आलेला पांढरा फेस चमच्याने काढून टाका. नंतर त्यात २ थेंब तेल आणि हळद घालून कुकरचे झाकण लावा. डाळ एकदम स्वच्छ होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६

**महालयारंभ, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, उ.भा.११।०८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** तुमच्या कामाचे कौतुक होईल.

**मिथुन :** आज प्रवासाचे योग आहेत. नवीन ओळखी फायद्याच्या ठरतील.

**कर्क :** मानसिक तणाव थोडा वाढेल. पैशाच्या व्यवहारात सावध रहा.

**सिंह :** तुमचे नेतृत्व गुण दिसून येतील. समाजात मान-सन्मान वाढेल.

**कन्या :** आरोग्याच्या छोट्या तक्रारी जाणवतील. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**तूळ :** प्रेम संबंधात गोडवा वाढेल. व्यवसायात लाभ होईल.

**वृश्चिक :** शत्रू तुमच्यापासून दूर राहतील.

**धनु :** विद्यार्थ्यांना यश मिळण्याचे योग आहेत. नोकरीत बदलाचे संकेत आहेत.

**मकर :** घरात शुभ कार्य घडेल. वडीलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**कुंभ :** भावंडांसोबत वाद होऊ शकतो. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** आजचा दिवस मौज-मजेत जाईल. नातेवाईकांची भेट होईल

## शब्दगंध क्र. ७५२४ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | | |
| | ■ | ९ | १० | | | ■ | |
| | ■ | ११ | | ■ | १२ | | |
| १३ | १४ | ■ | १५ | १६ | | ■ | ■ |
| ■ | | ■ | १७ | | ■ | १८ | १९ |
| २० | | २१ | ■ | २२ | २३ | | |
| २४ | | | ■ | २५ | | | ■ |

**आडवे शब्द :-** १) गायनातील एक राग ७) बावरलेला; घाबरलेला ८) उशिराने पिकणारे धान्य ९) 'कॉम्प्युटर'चे मराठी रूप ११) मुंडक्याविना शरीर; पूर्ण १२) मागे पाऊल; मागे सरणे १३) परवानगीने काढलेली सुट्टी १५) धनुष्य; धनुष्याकृतीसारखे बांधकाम; महिरप १७) पद्धत; तऱ्हा; चाल; रिवाज १८) कपट; कट; कारस्थान २०) अधिक चांगला; श्रेष्ठ २२) संकट; अरिष्ट; आपत्ती; विपदा २४) जंगलाला लागलेली आग; दावानल २५) एक धातू; रुपे; चांदी

**उभे शब्द :-** १) उत्तरदायित्व असलेला; जिम्मेदार २) एक धान्य; जव; सातू ३) भीमाने मारलेला मगधचा एक राजा ४) यंत्र झिजू नये म्हणून त्याच्या सांध्यात घालतात ते तेल वगैरे ५) धनुष्यबाण ६) वेशीवरचा पहारेकरी १०) किल्ल्यावरचा पहारेकरी; किल्लेदार १४) न झोपता रात्र काढणे १६) श्रीमंत; धनवान; तालेवार १८) एक दक्षिण भारतीय आडनाव जे हॉटेल व्यवसायासाठी प्रसिद्ध आहे १९) वारा; दिवा लावण्यासाठी बनविलेली कापसाची सुरळी २०) सवय; राबता; चाल; परिपाठ २१) एक अधिक पाव २३) शरम; हया; लज्जा

### शब्दगंध क्र. ७५२३ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | मा | न | शी | ल | ■ | बा | रा |
| म | ग | ■ | ल | ल | का | री | ■ |
| र | ■ | र | वा | ना | ■ | क | सा |
| स | ल | मा | न | ■ | खे | ■ | ■ |
| ता | त | ■ | ■ | प | ळ | वा | ट |
| ■ | को | र | फ | ड | ■ | चा | र |
| पा | ड | ■ | ट | व | का | ■ | फ |
| प | गा | र | ■ | ळ | ■ | सा | ल |

### फिल्मीचक्कर क्र. १२५५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | भी | खु | शी | क | भी | ग | म |
| भी | ■ | द्वा | ■ | हा | ■ | ■ | ह |
| क | ■ | र | ज | नी | ■ | क | ल |
| भी | ■ | ■ | ■ | कि | मी | ■ | हो |
| ■ | बे | दी | ■ | स्म | ■ | आ | ■ |
| अ | ■ | दी | क्षि | त | ■ | द | म |
| म | द | त | ■ | की | म | त | ■ |
| र | ■ | रा | धा | ■ | ■ | से | ठी |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** मन शांत असेल तर सगळे निर्णय बरोबर येतात, आणि मन अशांत असेल तर सगळे निर्णय चुकतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कुत्र्याला सर्व ब्लॅक अॅण्ड व्हाईट दिसते का?

आपल्यापैकी बहुतेकांना असं वाटतं की माणसाला जसं रंगीबेरंगी जग दिसतं तसं कुत्र्याला दिसत नाही आणि त्याला सगळं काही जुन्या चित्रपटासारखं फक्त काळं आणि पांढरं दिसतं. पण विज्ञानाने केलेल्या तपासणीतून हे सिद्ध झालं आहे की हा विचार अगदीच चुकीचा आहे. कुत्र्याचं जग काळं पांढरं नाहीये तर ते एका वेगळ्याच रंगात रंगलेलं आहे. यामागचं कारण त्यांच्या डोळ्यांच्या रचनेत आहे. आपल्या डोळ्याच्या पडद्यावर रंग ओळखणाऱ्या तीन प्रकारच्या लहान पेशी असतात ज्यामुळे आपल्याला लाल, हिरवा आणि निळा असे मुख्य रंग आणि त्यापासून बनणारे हजारो रंग दिसतात. पण कुत्र्याच्या डोळ्यात अशा फक्त दोनच प्रकारच्या पेशी असतात. निसर्गाने त्यांना तिसऱ्या प्रकारची पेशी दिलेलीच नाहीये. त्यामुळे त्यांच्या पाहण्याची पद्धत आपल्यापेक्षा वेगळी होते. कुत्र्याला निळा रंग अतिशय स्पष्ट आणि सुंदर दिसतो. त्याचबरोबर पिवळा रंग देखील तो अगदी सहज ओळखतो. पण जेव्हा लाल रंग त्याच्यासमोर येतो तेव्हा तो लाल म्हणून त्याला दिसतच नाही तर तो त्याला एक प्रकारचा फिक्कट पिवळा किंवा तपकिरी रंग वाटतो. अगदी तसंच हिरव्या रंगाचं देखील होतं. हिरवा गवताळ भाग त्याला हिरवा न वाटता पिवळसरच दिसतो. म्हणजे आपण लाल चेंडू हिरव्या गवतावर फेकला तर आपल्याला तो लगेच दिसेल पण कुत्र्याला तो चेंडू आणि गवत दोन्ही एकाच रंगाचे वाटल्यामुळे तो गोंधळून जाईल.याचा अर्थ असा नाही की कुत्र्याची नजर कमकुवत आहे. उलट काही बाबतीत त्याची नजर आपल्यापेक्षा कितीतरी पटीने चांगली आहे.

### मुका घोडा

एका शेतकऱ्याकडे एक मुका घोडा होता. तो कधीच हिणहिणत नसे, म्हणून गावकरी त्याला हसायचे आणि म्हणायचे असा घोडा काय कामाचा. एक दिवस जंगलात आग लागली. सगळे घोडे घाबरून जोरजोरात ओरडू लागले आणि आपल्या मालकाला पाडून पळून गेले.पण हा मुका घोडा घाबरला नाही. तो शांतपणे वेगाने धावत राहिला आणि आपल्या मालकाला सुरक्षित घरी घेऊन आला. बोध – शांत राहणारा माणूसच संकटात खरा कामी येतो, जास्त बोलणारा नाही.

## आत्मशक्ति



बौद्ध धर्मात एक चांगली म्हण पहावयास मिळते. जो मनुष्य आपल्या मुखात कुऱ्हाड घेऊन जन्माला येतो तो आपल्या घाणेरड्या बोलण्याने स्वतःला त्या कुऱ्हाडीने तोडीत असतो. (सूत्र निपाता ६५७-६०) पापाचा परिणाम आमच्या आत्म्यावर आणखी एक आवरण चढण्यावर होतो. त्यामुळे आपल्या अंतरीय सौंदर्य, प्रेम व खजिन्यापासून आपण दुरावतो. आपल्या अंगणी धन पुरलेले आहे पण आपल्या वाईट कर्मांनी आपण ते अधिकाधिक खाली धसवत जातो. आणि आपल्याला काहीच फायदा होत नाही. शेवटी आपण थकतो.जगात मतभेद रहाणारच! कोणत्याही दोन

### दृष्टीकोन

माणसांच्या विचार, दृष्टीकोन आणि कार्यपध्दतीमध्ये फरक पडणारच! ज्याला हिंसेची झळ पोहचते, तो हिंसा करणाऱ्या माणसाशी केव्हाही सहमत होणार नाही. उलट त्यांचे मतभेद वाढतच जाणार!

एक दिवस तो माणूस सूड घेणार. आपण पहातोच की, अत्याचार सहन करणारा एक दिवस स्वतः अत्याचारी बनतो. हिंसेपासून कोणाचाही फायदा होत नाही. आम्ही अहिंसेचा मार्ग धरला तर समस्येची उकल समाधानकारक रितीने होते. तेव्हा हिंसा आणि क्रोधापासून पूर्णतः सुटका हवी असेल तर आपण स्वतःला ओळखले पाहिजे. पूर्ण ताकदीनिशी आपण अंतर्मुख होत आत्म्याला ओळखले पाहिजे.खोटेपणा, कपट आणि पाखंडीपणाखोटेपणा, पाखंडीपणा आणि कपट ह्या गोष्टी आत्म्यावर आणखी एक आवरण टाकतात. आत्मा फक्त सत्य जाणतो, खोटेपणा नाही. पण मन त्याच्या इच्छेसाठी आपल्याला धोकेबाजीत ओढीत नेते. कारण त्याला हवी असलेली वस्तू पाहिजे असते. जे आमचे नाही ते आम्हाला हवे असते. तेव्हा आम्ही ते चोरीने अथवा धोकेबाजीने ते मिळवण्याचा प्रयत्न करतो. ज्या वस्तूवर आमचा हक्क नाही तो लुबाडण्याचा आम्ही प्रयत्न करतो. समोरच्याने ती वस्तू द्यावी म्हणून आम्ही छल, कपट वा धोकेबाजी करतो. ज्या माणसांना धनदौलत किंवा सत्ता ह्यासारख्या सांसारिक वस्तू पाहिजे असतात.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय :

शेजाऱ्यांबरोबर आणि नातेवाईकांबरोबरही तुलना केली जाते.

शिवानीदीदी :

हो.जर आपल्याला लहान मुलातील किंवा मोठ्या माणसांतील संस्कार बदलायचा असेल तर आपल्याला त्याच्याकडे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणूनच बघायला हवं. जर आपल्याला एखाद्याच्या

### आत्मविश्वास

कमजोरींबद्दल बोलायचं असेल तर सुरुवातीला त्याच्याशी त्याच्या चांगल्या गुणांबद्दल बोलणं खूप महत्त्वाचं आहे. नाही तर संस्कारांचं परिवर्तन खूप अवघड होतं. कोणत्याही प्रसंगासाठी हे खरं आहे. जर आपण एखाद्याला फक्त त्याच्यातले नकारात्मक गुण सांगितले तर त्याला खूप उदास वाटेल. त्यानंतर, त्याच्या संस्कारांमध्ये बदल करणं त्याला खूप अवघड होईल. म्हणून पहिल्यांदा त्या व्यक्तीतील चांगल्या गुणांबद्दल बोला. असं केल्याने त्या माणसाचा आत्मविश्वास वाढेल. त्याचं बळ वाढल्याने, त्याच्यात गरजेचे बदल करण्यासाठी तो तयार होईल. जर आपल्याला एखाद्याच्या सवयी बदलाव्यात म्हणून त्याला प्रेरणा द्यायची असेल (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : ऐकलं का, शेजारचे अहो जाहो करत बोलतात आणि तुम्ही अरे तुरे करता.

नवरा : अग त्यांची लग्नाला १ वर्ष झाले, आपल्या लग्नाला १० वर्ष झाली! अहो माझी राणी, चहा टाकू का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ ब्राह्मण समाजात पेशवे कोणत्या पोटशाखेचे होते?

– चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'स्वकष्टाचं अमूल्यत्व...'

गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ स्वकष्टानं स्वतःला घडवणाऱ्या, स्वतःला सिध्द करुन प्रतिकुल परिस्थितीवर मात करणाऱ्या काही व्यक्तींना मी पाहिलं आहे. ह्यांमध्ये माझे काही मित्र, मैत्रिणी, नातेवाईक, परिचित ह्यांचा समावेश आहे. प्रतिकुल परिस्थिती आहे, त्याने परिस्थिती बदलण्यासाठी कष्ट घेतले नाहीत. आजही ती व्यक्ती वीस वर्षांपूर्वी ज्या स्थितीत राहात होती, ज्या भाड्याच्या घरात राहात होती ती तिथेच आहे अशा मोजक्या व्यक्तीही मी पाहिल्या आहेत कारण स्वकष्टाचं अमूल्यत्व त्यांना समजलं नाही अथवा अमूल्यत्व समजलं असलं तरी त्यांना मनापासून वाटलंच नाही की ह्या प्रतिकुल परिस्थितीवर मात करावी. ह्याला कारण म्हणजे त्या व्यक्तींमधला आळस, सकारात्मक विचार आणि त्या सकारात्मक विचारानुसार कृती न करण्याची त्यांची इच्छा. मनुष्यजन्म अर्थात हे जीवन आपल्याला एकदाच मिळतं.

मग ह्या एकदाच मिळणाऱ्या जीवनात तुम्ही, प्रतिकुलतेवर मात करणार नसाल तर मग जीवन ह्या शब्दाचा अर्थच तुम्हाला कळालेला नाही. कष्ट करण्याची इच्छा नाही असा व्यक्ती आर्थिकदृष्ट्या परिस्थितीने कसा असेल हे सांगण्याची कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. माझा वर्ग मित्र शिवाजी किसन ससाणे. १९८० साली एक रुपया रोजाने रात्री हॉटेलमध्ये काम करायचा. रात्री तेथेच अर्थात हॉटेलमध्येच तर कधी बोर्डिंगमध्ये राहायचा. दिवसा शाळेत यायचा. स्वकष्टाचं अमूल्यत्व त्याला समजलं. आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी आणि सचोटीने, प्रामाणिकपणे काम केलं. शिक्षण घेतलं. व्यवसायाला सुरुवात केली. आमच्या वहिनींची त्याला चांगली साथ मिळाली. दोन्हीही मुलांवर, दोघांनी सुसंस्कार केले, शिक्षण दिलं. आज दोन्हीही मुलं नामांकित कंपनीत काम करताहेत. मागील वर्षी ससाणे कुटुंबाने नाशिकसारख्या मोठ्या सिटीमध्ये फ्लॅट घेतला. शुन्यातुन विश्व निर्माण करणाऱ्या माझ्या ह्या मित्राला, त्याच्या कुटुंबाला मी, मनापासून सलाम करतो. शिवाजी, माझ्यासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहे.

पाण्यात पडल्यावर हात, पाय हलवावेच लागतात. स्वकष्टाशिवाय जगणं व्यर्थ आहे. बापकमाईवर अथवा इतरांना फसवुन, लुटुन, ओरबाडुन खाणारे कधीही समाधानी, सुखी राहुच शकणार नाहीत. स्वतःच्या कष्टाची भलेही अर्धी भाकर खा. स्वकष्ट घेऊन मिळवलेलं, आपल्याला प्रेरणा देतं, आनंद – समाधान देतं. स्वतः जेव्हा कष्ट करतो तेव्हा आपल्याला त्या कष्टाची– परिश्रमाची जाणीव असते, असायलाच पाहिजे. स्वतः कष्ट करणं हा सुसंस्कार आहे तशीच ती शिस्तबध्द जीवनाची सवय आहे. एखाद्या व्यक्तीला त्याने घेतलेल्या शारिरिक अथवा मानसिक कष्टाचा मोबदला मिळतो. पण माझ्याकडे अधिकाधिक पैसा असावा ह्या हव्यासापोटी, मोहापोटी तो भ्रष्ट आचार करु लागतो. तिथेच त्याची अधोगती सुरु झालेली असते, 'माणूस' म्हणून तो अपात्र ठरतो कारण दुसऱ्याने केलेल्या कष्टाचे पैसे हा भ्रष्ट आचार करणारा व्यक्ती घेतो हे अत्यंत चुकीचं, लांछनास्पद आहे. अधिकाधिक पैश्यांची हाव भ्रष्ट आचार करणाराला दुःखाच्या दरित ढकलत असते हे त्यालाही लक्षात येत नाही.

स्वकष्टाने एखाद्या व्यक्तीने यश मिळवलं, बंगला – गाडी घेतली, मुला-मुलींवर सुसंस्कार केले अशा व्यक्तीचा सन्मान, तुम्ही केल्याचं आठवतं का ? खरं तर हा सन्मान हा व्यक्तीचा नसतोच तर तो असतो त्याच्या कष्टाचा सन्मान – आदर. जी व्यक्ती इतरांच्या कष्टांचा आदर करते, सन्मान करते ती व्यक्ती नक्कीच मोठ्या मनाची असते. स्वार्थासाठी त्या व्यक्तीच्या कष्टाचा सन्मान करणार असाल तर तो आनंद अल्पकाळ असतो.

सातत्याने कष्ट करणं ही एक प्रकारे श्रमाची आराधना आहे. श्रमाची पुजा करणं आहे. स्वकष्टातुन जो मोबदला मिळाला त्यात आनंदी राहायला पाहिजे. प्रामाणिकपणे सातत्याने केलेल्या कष्टाची फळं ही नक्कीच अवीट गोडीची असतात. मी जसे कष्ट घेतो तसेच कष्ट समोरचाही घेतो त्याची जाणीव आपल्याला असायलाच पाहिजे. प्रत्येकवेळी केलेल्या कष्टाचं फळ लगेच मिळतं असंही नसतं. सर्वात महत्वाचं म्हणजे प्रत्येक वेळचे कष्ट स्वतःसाठी करु नका. काही वेळा इतरांचं भलं व्हावं ह्यासाठीही कष्ट करा. ह्या अशा कष्ट करण्यामुळे मिळणारा आनंद, समाधान, सुख देऊन जातो. आपण समाधानी – सुखी असावं असं प्रत्येकाला मनापासून वाटत असतं. जे मनापासून चांगलं असं वाटतं चांगलं असं वाटतं ते ते स्वतःसाठी करतांनाच इतरांसाठीही करा. दुसऱ्याच्या कष्टाची जाणीव ठेवा म्हणजे स्वकष्टाचं अमूल्यत्व लक्षात येईल. 'साहित्य सहवास' माध्यमातुन सलग तेराव्या वर्षीही मी लेखनाचे कष्ट घेतो आहे ह्यामुळे मला मिळणारं समाधान – सुख शब्दातीत आहे. (लेख क्र.६१९)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भाशयाला सूज असेल, ज्यांना रक्तस्त्राव जास्त होत असेल, योनीभागामध्ये जखम असेल तर कॉपर-टी बसवू नये.पुरुषांमध्ये वापरावयाची संततिप्रतिबंधक साधने :

१) निरोध : हे साधन पुरुषांनी वापरावयाचे असते. सर्वांत सुरक्षित व शरीरावर कुठलाही

### गर्भसंस्कार केंद्राचे प्रयोजन

दुष्परिणाम होणार नाही असे हे साधन असते. नवविवाहितांनी शक्यतो निरोधचाच वापर करावा. निरोध वापरताना कधीकधी ते फाटण्याची शक्यता असते. निरोध फाटल्यानंतर कदाचित गर्भधारणा होण्याची शक्यता असल्यामुळे त्या बाबत काळजी घ्यावी.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





नगर–पुणे रोड, केडगाव येथील अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड या औद्योगिक संस्थेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २३ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेचे कारखानदार सभासद उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

# अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेटची ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत; सर्व विषयांना सभासदांची मंजुरी; सभासदांच्या सूचना व मार्गदर्शनाचा स्वीकार

### उत्कृष्ट कामगिरीबद्दल कारखानदार सभासदांचा सन्मान

नगर – नगर–पुणे रोड, केडगाव येथील अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड या औद्योगिक संस्थेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २३ सप्टेंबर रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेचे कारखानदार सभासद उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

सभेदरम्यान सभासदांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून संस्थेच्या प्रगतीसंदर्भात विविध सूचना व मार्गदर्शन केले. संस्थेच्या संचालक मंडळाने सभासदांच्या सूचनांचे स्वागत करून संस्थेच्या पुढील वाटचालीत त्यांचा सकारात्मक विचार करून आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याचे आश्वासन दिले. औद्योगिक विकासासोबतच सहकाराच्या माध्यमातून संस्था अधिक सक्षम व अग्रगण्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. सभेच्या निमित्ताने संस्थेच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध कारखानदार सभासदांचा सन्मान व गौरव करण्यात आला. विशेषतः संस्थेच्या संचालिका व संस्थेच्या माजी चेअरमन श्रीमती प्रमिलाबाई हेमराज बोरा यांचा विशेष सन्मान करण्यात आला. उद्योजक सौरभ बोरा यांच्या मातोश्री म्हणून तसेच संस्थेच्या माजी चेअरमन व विद्यमान संचालिका म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला.

सौरभ बोरा हे तिरुमला तिरुपती देवस्थान ट्रस्टचे तीन वेळा ट्रस्टी राहिले असून, यावर्षी अहिल्यानगर येथे झालेल्या समर्पण चातुर्मास उपक्रमात त्यांनी योगदान दिले. विविध उपक्रमांना त्यांनी प्रमुख लाभार्थी म्हणून सहकार्य केले. सौरभ बोरा यांना संस्थेच्या वतीने सभेस उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले होते; मात्र त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे त्यांना उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे श्रीमती प्रमिलाबाई बोरा यांचा संस्थेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

तसेच संस्थेचे सभासद कारखानदार अमित खटोड हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्याच्या निमित्ताने त्यांच्या टीमसोबत दावोस येथे गेले होते. त्यांच्या या सहभागाची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांचाही सन्मान व गौरव करण्यात आला.

सभेस अहमदनगर मर्चंट्स को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे नवनियुक्त चेअरमन संजय फुलचंद चोपडा तसेच अहमदनगर ग्राहक भांडारचे चेअरमन विक्रम फिरोदिया उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला.

सभेच्या शेवटी संस्थेच्या पुढील वाटचालीबाबत संचालक मंडळाने भूमिका स्पष्ट करताना, सभासदांनी केलेल्या सूचना आगामी काळात आवश्यकतेनुसार अमलात आणल्या जातील, असे सांगितले. औद्योगिक विकास आणि सहकार या दोन्हींचा समन्वय साधत अहमदनगर इंडस्ट्रियल इस्टेटला अधिक सक्षम, प्रगत व अग्रगण्य संस्था बनविण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सभेचे वातावरण उत्साहपूर्ण व आपुलकीचे होते. सभासदांच्या सक्रिय सहभागामुळे ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वीरीत्या पार पडली.

# प्रेरणादायी अक्षरधन

### स्वबळावर मोठे व्हावे



सिंहाला कुणी शिकविले आहे का, की तू शिकार कर म्हणून? त्याला कुणी राजीखुशीने म्हटले आहे का, की तू आमचा राजा हो म्हणून? नाही ना? स्वतःच्या बळावर तो मत्त हत्तीचीही शिकार करतो. प्रचंड पराक्रमाने सर्व प्राण्यावर प्रभाव पाडून तो स्वतःहूनच राज्य करतो. जंगलातील यच्चयावत प्राण्यावर त्याची हुकूमत' चालते. त्यासाठी कुठला जाहीरनामा किंवा हमीपत्र त्याला प्रसिद्धीला द्यावे लागत नाही. माणसाने स्वबळावर मोठे व्हावे. स्वचारित्र्याने व सत्कर्माने सर्वांच्या हृदयांवर राज्य करावे. यासाठीच कवीने सिंहाचे हे उदाहरण दिले आहे.

तरुणांनी असाच स्वबळावर सन्मान मिळवावा. अधिकार, धन व मान मागून का मिळवायचा? भिकारवृत्तीने उच्चपदाची शिकार कशी साधता येईल. समर्थ रामदास उपजत शक्तीचा शोध घेतात. तरुणांनी त्या शक्तीचे स्वरूप जाणावे म्हणून जोरकसपणे वर्णन करतात.

संत्राणे उड्डाणे हुंकार वदनी करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनी कडाडिले ब्रम्हांड धोका त्रिभुवनी सुरवार निशाचर त्यां जाल्या पळणी कडाडिले पर्वत उड्डुगण उच्छेद रामीरामदासा शक्तीचा शोध.

स्वयंभू सामर्थ्य कसे? नुसत्या हुंकारे जगाला लावी पिसे. देव, माणूस आणि राक्षसांच्या मनी भीती वसे. त्या सामर्थ्यांची झेप पाहताच ब्रम्हांडाला धाप लागे. अचल म्हणविणारा पर्वत चळाचळा कापे. ताऱ्यांचा नभी चुरा पसरे अशा शक्ती जर तरुणा, तुझ्यात संचारतील; तर जगाचे दैन्य, दुःख ताप हरेल.

आजकाल लोकांत याचक वृत्तीच फार जाणवते. हा याचक मोठा जाचक. तो दिसला की, लोकांची तोंड वेडीवाकडी होतात. याचकाचे तोंड मात्र भलतेच हलके. काहीही मागायला जड नाही वाटत त्याला. अगदी क्षुद्र, हलका प्राणी.

वाळलेले गवत हलके, कापूस तर गवताहूनही हलका आणि हा याचक तर त्या कापसाहूनही हलका. कवी म्हणतो, की हा वारा गवताला उडवतो, कापसाला घेऊन पळतो. पण तो याचकालाच का टाळतो? अहो, तो याचक आपल्याकडेही काही मागेल, अशी भीती वाटते वाऱ्याला म्हणून अगदी मोठा दाता उदार झाला, तरी मानी लोक त्याच्याकडून काहीच न घेता स्वबळावरच कमावतात हवे तेवढे.

अरबस्तानातील हातीमताईला एकदा खूप दुःख झाले. हातीमताई सढळपणे नजराणे व दान देण्याचे नाव कमावून बसला होता. तो जाई त्या गावी अन्नदान करी, मागतील त्यांना हवे ते देई. घरची होती परंपरागत श्रीमंती. त्या दिवशी एका लहानशा गावी त्याने गावभोजन दिले. लोकांना खूप दान केले. सगळ्यांनी हातीमताईचे गुणगान आरंभिले, तरी पण तो दुःखी होता. आज त्याचा पराभव झाला होता. एका यःकश्चित लाकूडतोत्याने त्याच्या औदार्याचा व दानशूरतेचा फज्जा उडविला होता. तो लाकूडतोत्या हातीमताईच्या गावभोजनाला गेला नव्हता.

बापजाद्यांच्या कमाईवर दानशूरतेची व औदार्याची टिमकी वाजवणे, यात काय शौर्य? स्वतःच्या मेहनतीने कमवावे आणि मानाने जगावे. हातीमताई लोकांना वाईट सवयी लावतो, त्यांची फुकटवृत्ती पोसतो. लाचारी शिकवतो, असे त्या लाकूडतोत्याचे म्हणणे होते. हातीमताई हादरला. त्याच्यापुढे हरला. जो आत्मबळावर जगतो, त्याच्या मागे मानसन्मान नाचत येतो. – **किशोर गांधी**

# जागतिक रेबीज दिनानिमित्त नगर शहरात २८ सप्टेंबर रोजी मोफत लसीकरण शिबीर

नगर – जागतिक रेबीज दिनानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, अहिल्यानगर व जायंटस् ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत रेबीज लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीर २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हा पशुसर्व चिकित्सालय, स्टेशन रोड अहिल्यानगर येथे होणार आहे. यावर्षी जागतिक रेबीज दिनाची थीम Stronger Together – एकत्रितपणे अधिक मजबूत अशी असून, Rabies is preventable - Vaccinate - Educate - Eliminate हा संदेश देण्यात येणार आहे. शिबिरास डॉ. उमेश पाटील, उपायुक्त पशुसंवर्धन व डॉ. मुकुंद राजळे, सहाय्यक आयुक्त, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, अहिल्यानगर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

जायंटस्चे अध्यक्ष राजेंद्र कटारिया व स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, रेबीज हा प्राण्यांपासून मानवास होणारा अत्यंत घातक व प्राणघातक झुनोटिक आजार आहे. या आजारापासून बचावासाठी पाळीव कुत्रे व मांजरींना वेळेवर लसीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे पशुपालक व पशुप्रेमींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

या शिबिरात पाळीव श्वानांना मोफत रेबीज प्रतिबंधक लस दिली जाणार आहे. हा उपक्रम महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागाच्या पशुधन हिताय: बहुजन सुखाय: या ब्रीदवाक्यानुसार राबविण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या पाळीव प्राण्यांसह या शिबिरास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगरमध्ये गहना ज्वेलरी एक्झिबिशनचा शुभारंभ



नगर – नगरमधील आनंदऋषीजी हॉस्पिटल समोरील हॉटेल आयरिश येथे २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत गहना ज्वेलरी एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा शुभारंभ शुक्रवारी सकाळी झाला. सेलिब्रिटी परिधान करत असलेल्या खास दागिने यंदा या प्रदर्शनाचे वैशिष्ट्ये आहे. प्रदर्शनाला पहिल्याच दिवशी नगरकरांनी प्रतिसाद देत खरेदीचा आनंद लुटला. शुभारंभ प्रसंगी ॲडमंटाईन ज्वेलर्सचे मानव सिंघवी, सोहम क्रिएशनचे विमन अग्रवाल, एनडब्ल्यूएसचे नैनेश दहिवाडकर, कियान सिल्व्हचे विकास सोनी, गहनाचे मन खेरगांवकर उपस्थित होते.

मन खेरगांवकर यांनी सांगितले की, सोने आणि डायमंड दागिन्यांबाबत ग्राहक अधिक चोखंदळ असतात. सध्याच्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात जगभरातील फॅशन ट्रेंड क्षणात सर्वत्र पोहोचतो. गहनाने असेच नवनवीन फॅशन ट्रेंड व पारंपरिक आभूषणे प्रदर्शनातून नगरकरांसाठी आणले आहेत. यावर्षी सेलिब्रिटी परिधान करत असलेले खास डिझाईनचे दागिने नगरकरांसाठी आणले आहेत. नववधूचे सौंदर्य खुलवणारे खास दागिने यात आहेत. या एक्झिबिशनमध्ये मुंबई येथील ॲडमंटाईन ज्वेलरी या ब्रॅण्डचे खास डायमंड ज्वेलरी कलेक्शन आहे. ॲडमंटाईनच्या प्रशिक्षित व अनुभवी टीमचा उच्च दर्जाचे डायमंड कटिंग व दागिने तयार करण्यात हातखंडा आहे. प्रत्येक दागिना अतिशय सुंदर कलाकुसर आणि आखीवरेखीव असेल याची विशेष काळजी घेतली जाते. विश्वसनीयता जपत ग्राहकांना त्यांचे मनपसंत डिझाईनचे दागिने उपलब्ध करून दिले जातात.

प्रदर्शनात ३३ वर्षांची परंपरा असलेल्या मुंबईतील सोहम क्रिएशनच्या दागिन्यांची खास व्हरायटी उपलब्ध आहे. यात डेली वेअर डिझाईन, नववधूचे सौंदर्य खुलवणारे खास दागिने आप्तस्वकीय, प्रियजनांना देण्यासाठी खास गिफ्ट आर्टिकल उपलब्ध आहेत. अप्रतिम कारागिरी व सौंदर्य सोहमच्या दागिन्यांचे वैशिष्ट्य आहे.

पुण्यातील कियान सिल्व्हरची खास रेंज प्रदर्शनात आहे. लेसर कट व अँटिक सिल्व्हर ज्वेलरी वुईथ रेडिएंट गोल्ड फिनिशिंग, सिल्व्हरच्या किंमतीत सोन्याच्या दागिन्यांची अनुभुती लाईट वेटमध्ये उपलब्ध आहेत. याशिवाय पुण्यातीलच अतिशय दीर्घ परंपरा असलेले एन.डब्ल्यू. शामसेट (एन.डब्ल्यू.एस.) ज्वेलर्सची खासियत असलेली ज्वेलरी या प्रदर्शनात आहे. डायमंड, पोलकी व १८ कॅरेट गोल्ड या ज्वेलर्सचे वैशिष्ट्ये आहे. एक्स्लुसिव्ह डिझाईनची ज्वेलरी मनाला भावणारी ठरेल. अनेकदा नगरमधील ग्राहक पुणे, मुंबईत शोरूममध्ये खरेदीसाठी जातात. गहना ज्वेलरी प्रदर्शनामुळे महानगरांतील शोरूम्स खास कलेक्शन घेऊन नगर आले आहेत. सकाळी १०.३० ते रात्री ८.३० यावेळेत भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तपस्येमुळे आत्मिक आनंद मिळतो : प्रविणऋषीजी महाराज

### आनंदतीर्थ समवशरण येथे कविता गांधी यांच्या ३१ उपवासांचे पच्चक्खाण



आनंदतीर्थ समवशरण येथे कविता गांधी यांनी ३१ उपवासांचे पच्चक्खाण केल्याबद्दल समर्पण चातुर्मास समितीच्या वतीने त्यांचा मानपत्र, शाल व माला देऊन सत्कार करण्यात आला.

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात भाविक अतिशय श्रद्धेने धर्म साधना, तपस्या, उपवास करत आहेत. आत्मोन्नतीची अनुभूती देणारा चातुर्मास सर्वांना सकारात्मक ऊर्जा देणारा ठरत आहे. भिंगार येथील सौ. कविता प्रफुल्ल गांधी (करंजीवाले) यांनी या अनुष्ठानात सहभागी होत मासखमण (३१ उपवास) केले आहेत. त्यांच्या तपस्येचे पच्चक्खाण शनिवारी झाले.

श्राविका सौ. कविता गांधी यांनी चातुर्मासात अतिशय श्रद्धेने ३१ दिवसांचे उपवास केले. त्यांचे पच्चक्खाण महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात झाले. यानिमित्त आनंदधाम ते आनंदतीर्थ समवशरण पर्यंत वरघोडा काढण्यात आला. तसेच तपस्वींसाठी पुणे येथील जैन गायक तरूण मोदी यांचा भावा कार्यक्रम झाला.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे उद्योगपती आणि अहिल्यानगरचे पुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

तपस्वी कविता गांधी यांचा समर्पण चातुर्मास समितीच्या वतीने मानपत्र, शाल व माला देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, प्रफुल्ल गांधी, प्रमोद गांधी, मांगीलाल गांधी, सीए प्रवीण कटारिया, सीए अमित फिरोदिया व गांधी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, गुरूदेवांच्या कृपेने नगरमध्ये चातुर्मासात आबालवृद्ध भाविक तपस्या करत आहेत. श्रद्धा ठेवून केलेल्या तपस्येमुळे आत्मिक आनंद मिळतो. करंजी येथील गांधी परिवार अतिशय धार्मिक आहे. चिचोंडी येथील आनंदतीर्थ साठी या परिवाराने आर्थिक योगदान देण्याचे जाहीर केले आहे. या परिवाराची धर्माप्रती श्रद्धा आणि भक्ती कौतुकास्पद आहे.

# उत्कृष्ट कार्याबद्दल रामकृष्ण अर्बन पतसंस्थेचा गौरव



नगर – नाशिक विभागीय फेडरेशन, राज्य फेडरेशन व जिल्हा–तालुका फेडरेशनच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या सहकार्याने एडीसीसी बँकेच्या स्व.आ. शिवाजीराव कर्डिले सभागृहात आयोजित कार्यशाळेत श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी लिमिटेड अहिल्यानगर या पतसंस्थेच्या सक्षम व उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, सेवानिवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे, सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे, अनिरुद्ध देवचक्के, राजीव गांधी पतसंस्थेचे अध्यक्ष उद्धव दुसुंगे आदींच्या उपस्थितीत पुरस्कार स्वीकारताना व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, ज्येष्ठ संचालक लक्ष्मीकांत झंवर, संचालक विश्वनाथ कासट, संचालिका शोभा राठी, अनुरीता झगडे, व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, ओ. एस. डी. कुमार आपटे आणि प्रशांत टोणपे आदी उपस्थित होते.

श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेचा जिल्ह्यात चांगला नावलौकिक आहे. तसेच संस्थेचा अ वर्ग ऑडिट दर्जा आहे. एनपीए शून्य टक्के आहे. सर्व संचालक मंडळ अत्यंत पारदर्शीपणे कार्य करीत असल्याने संस्था प्रगतीपथावर आहे. संस्थेच्या आदर्श वाटचालीमुळे संस्थेच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मागील वर्षी महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांच्या वतीने पतसंस्था चळवळीत दिशादर्शक कार्याबद्दल मानाचा दीपस्तंभ पुरस्कार देऊन गोकर्ण महाबळेश्वर येथे पार पडलेल्या सोहळ्यात संस्थेला गौरविण्यात आले होते.



कोहिनूर मॉल येथे मोदक स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्या सोबत कोहिनूर मॉलच्या संचालिका श्रीमती नीता गांधी, परीक्षक अर्चना खंडेलवाल आणि वैशाली खंडेलवाल.

# नगरमधील कोहिनूर मॉलमध्ये 'मोदक रेसिपी' व 'गणपती बाप्पा विशेष प्रश्नमंजुषा' स्पर्धेला प्रतिसाद

नगर – शहरातील कोहिनूर मॉलमध्ये गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'मोदक रेसिपी स्पर्धा' आणि 'गणपती बाप्पा विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धा' उत्साहात पार पडली. या दुहेरी उपक्रमाला महिलांनी प्रतिसाद दिला. पारंपरिक आणि आधुनिक चवींचा संगम घडवून आणणाऱ्या मोदक स्पर्धेत विविध स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. उकडीचे मोदक, तळणीचे मोदक, ड्रायफ्रूट्स मोदक, चॉकलेट मोदक आणि नाविन्यपूर्ण 'फ्युजन' मोदक अशा वैविध्यपूर्ण प्रकारांचे सादरीकरण स्पर्धकांनी केले. चव, सादरीकरण आणि कल्पकता या निकषांवर परीक्षकांनी विजेत्यांची निवड केली.

त्याचप्रमाणे 'गणपती बाप्पा स्पेशल प्रश्नमंजुषा' स्पर्धेत बाप्पाची विविध रूपे, पौराणिक कथा आणि गणेशोत्सवाचा इतिहास यावर आधारित रंजक प्रश्नांना स्पर्धकांनी उत्तरे दिली. या प्रश्नमंजुषेने मॉलच्या आवारात एक वेगळाच उत्साह निर्माण केला होता. मोदक स्पर्धेत सौ. सविता मुनोत यांनी प्रथम, सिया गुंदेचा यांनी द्वितीय, तर अमृता शेंडगे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच सुजाता उधारे व रोहिणी मुर्तडक यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. प्रश्नमंजूषा स्पर्धेत रेखा छप्पनिया यांनी प्रथम, नीलम भळगट यांनी द्वितीय, तर अजय शुक्ला यांनी तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांना कोहिनूर मॉलच्या श्रीमती नीता गांधी, रामेश्वर स्वीट्स ॲण्ड नमकीनचे आनंद खंडेलवाल, परीक्षक सौ. अर्चना खंडेलवाल, सौ. वैशाली खंडेलवाल यांच्या हस्ते रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. तसेच प्रत्येक सहभागी स्पर्धकांना रामेश्वर स्वीट्स यांच्याकडून गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.

# नगरमध्ये २७ सप्टेंबरला 'जरा हटके' कार्यक्रम

### लतादीदींच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला स्वरांचा अपूर्व सोहळा

*लतादीदींच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला अहिल्यानगरमध्ये स्वरांचा अपूर्व सोहळा; ' श्री गुरुमाऊली संगीत विद्यालय' सादर करीत आहे नगरकरांसाठी एक वेगळा कार्यक्रम...*

भारतीय चित्रपटसृष्टीच्या संगीताचा पट अत्यंत विशाल, अथांग आणि अलौकिक आहे. या स्वरांच्या नभोमंडळात अनेक स्वयंप्रकाशित तारका उगवल्या अन् त्यांनी आपल्या दैवी सुरांनी जगभरातील करोडो रसिकांच्या हृदयावर अखंड अधिराज्य गाजवले. परंतु, हिंदी चित्रपटसंगीताच्या एका खास सुवर्णयुगाच्या साक्षीदार राहिलेल्या आणि त्या युगाला आपल्या चैतन्यमयी स्वरांनी समृद्ध करणाऱ्या 'स्वरतारकां'चे स्मरण करणे, म्हणजे संगीताच्या पावन मंदिरात भक्तिभावाने नंदादीप उजळण्यासारखेच आहे. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या २८ सप्टेंबर रोजी येणाऱ्या जयंतीचे औचित्य साधून, श्री गुरुमाऊली संगीत विद्यालय सादर करीत आहे नगरकरांसाठी एक वेगळा कार्यक्रम! २७ सप्टेंबर रोजी अहिल्यानगरच्या ऐतिहासिक भूमीत रंगणारा 'जरा हटके' हा विशेष कार्यक्रम म्हणजे याच अलौकिक स्वरांचा एक अद्भूत, अविस्मरणीय आणि भव्य उत्सव ठरणार आहे.

या ऐतिहासिक संगीत प्रवासाचा श्रीगणेशा होतो तो अखंड हिंदुस्थानला आपल्या कसदार आणि संमोहनकारी स्वरांनी मोहिनी घालणाऱ्या 'मल्लिका–ए–तरन्नुम' नूरजहाँ यांच्यापासून. त्यांच्या स्वरातील नजाकत, कशिदाकारीसारख्या तान–हरकतींची ती खास शैली आणि गळ्यातील हरकतींचा अथांग विलास म्हणजे संगीताच्या विश्वाला मिळालेला एक अनमोल, चिरंतन वारसा होता. त्यांच्यापाठोपाठ आपल्या नजाकतदार आणि सहजसुंदर अभिनयासोबतच गळ्यातून कारुण्याचा, विराहाचा आणि प्रीतीचा अविरत निर्झर वाहणाऱ्या सुरैया यांनी आपल्या रेशमी स्वरांनी संपूर्ण पिढीला वेड लावले; सुरैया यांच्या आवाजातील ती मखमली आर्द्रता आणि शब्दांमधील प्रामाणिकपणा ऐकणाऱ्याच्या काळजाचा सहज ठाव घ्यायचा. त्याच काळात, हिंदी चित्रपटसंगीताच्या आरंभीच्या बाल्यावस्थेत आणि नंतरच्या टप्प्यात राजकुमारी यांच्या स्वरांनी गायकीला एक वेगळीच उंची गाठून दिली, त्यांचा परिपक्व, गंभीर आणि बैठकीचा आवाज आजही अभिजात संगीताच्या शास्त्रशुद्ध परंपरेची साक्ष देतो. तर दुसऱ्या बाजूला, गीता दत्त यांच्या स्वराविष्कारातील उत्स्फूर्तता, अथांग चंचलता अन् भावुकतेचा सागर कुणालाही एकाच क्षणात आनंदी तर दुसऱ्याच क्षणात व्याकुळ करून जायचा. 'बाबूजी धीरे चलना' मधील ती नटखट अडखळणारी लय असो वा 'वक्त ने किया क्या हसीं सितम' मधील अत्यंत खोल, शोकाकुल कारुण्य असो–गीताजींचा प्रत्येक सूर थेट श्रोत्याच्या काळजाचा ठाव घेणारा आणि आत्म्याला भिडणारा होता.

याच सुवर्णयुगात आपल्या मखमली अन् वेदनादायी स्वराने 'कभी तन्हाईयों में युं' म्हणत रसिकांच्या अश्रूंना मोकळी वाट करून देणाऱ्या मुबारक बेगम यांचा स्वर म्हणजे साक्षात कारुण्याचा आणि विरहाचा गाभारा होता. दुसरीकडे, लतादीदींच्या स्वराची सूक्ष्म छटा जपत स्वतःची एक स्वतंत्र, आदरयुक्त अन् सात्त्विक ओळख निर्माण करणाऱ्या सुमन कल्याणपूर यांच्या स्वरातील शुद्धता आणि पारदर्शकता रसिकांना नेहमीच तृप्त करत आली आहे. त्यांच्या स्वरात एक प्रकारची शांतता, पावित्र्य आणि स्पष्टता होती, ज्याने संगीताच्या प्रांगणात स्वतःचे एक अढळ स्थान निर्माण केले.

वादळासारखा धुमाकूळ घालणारा आणि आपल्या अचाट ऊर्जेने रंगमंच हलवून सोडणारा, वेगवान आणि लयबद्ध असा शमशाद बेगम यांचा बुलंद आवाज असो. किंवा काळाच्या ओघात सीमेपलीकडून आलेला 'दिल के अरमां आंसुओं में बह गये' म्हणत आपल्या अनुनासिक, गझलनुमा आणि अनोख्या दर्दभऱ्या स्वराने गझलेचा एक वेगळाच बाज चित्रपटसंगीतात मांडणाऱ्या सलमा आगा असोत या प्रत्येक गायिकेने या सुवर्णयुगाच्या पटलाला आपल्या वैशिष्ट्यपूर्ण, अद्भूत आणि अनोख्या रंगांनी सजवले.

आणि या संपूर्ण स्वरप्रवासाचे दोन उत्तुंग सुवर्णशिखर म्हणजे–आशा भोसले आणि भारतरत्न लता मंगेशकर! आशाताईंचा आवाज म्हणजे अडथळ्यांना छेदून जाणारा विजेचा कडकडाट, स्वरातील नटखटपणा, गाण्यातील जिद्द आणि स्वरांच्या नजाकतीचा अथांग आविष्कार! भावगीत असो, कठीण शास्त्रीय चीज असो, लावणी असो की वेस्टर्न कॅबरे, प्रत्येक शैलीला आपल्या जिवंत श्वासाने आणि अफाट ऊर्जेने जिवंत करण्याचे अभूतपूर्व सामर्थ्य आशाताईंच्या गळ्यात आहे. आणि या संपूर्ण स्वरमंडळाची ध्रुवतारा म्हणजे 'गानकोकिळा' भारतरत्न लता मंगेशकर! लतादीदींचा स्वर म्हणजे निव्वळ गायन नसून ती साक्षात ईश्वरनिर्मिती आहे. ज्या स्वरामध्ये गंगा–यमुनेचे असीम पावित्र्य आहे, ज्या स्वराने संपूर्ण शतकाची स्पंदने जपली आणि ज्या स्वराच्या केवळ स्पर्शाने मानवी मनातील प्रत्येक भावना अमर झाली, अशा दीदींच्या जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला हे सर्व सूर एकत्र येणे हा अहिल्यानगरच्या भूमीसाठी एक परमभाग्याचा, अलौकिक योग आहे.

असा बहुरंगी, बहुढंगी आणि दिग्गज पार्श्वगायिकांच्या अजरामर सुरांचा मिलाफ असलेला कार्यक्रम पूर्वी कधी झाला की नाही याची कल्पना नाही, पण सद्यस्थितीत तरी अहिल्यानगरमध्ये होणारा हा अत्यंत अभिनव, प्रयोगशील आणि ऐतिहासिक कार्यक्रम आहे हे निश्चित! म्हणूनच, २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी अहिल्यानगरच्या भूमीत रंगणाऱ्या या संगीतमयी संध्याकाळी सर्व स्वरतारकांना स्वरांजली वाहणाऱ्या या कार्यक्रमाचे 'जरा हटके' हे शीर्षक अत्यंत समर्पक, अर्थपूर्ण आणि यथायोग्य ठरते. संगीताचा हा दैवी वारसा अनुभवण्यासाठी आणि या अलौकिक स्वरांजलीचे साक्षीदार होण्यासाठी सर्व संगीतप्रेमी नगरकरांनी २७ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५:३० वाजता माऊली संकुल, सावेडी येथे होणाऱ्या या सोहळ्यास उपस्थित राहावे. आणि या अद्भुत व ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार व्हावे. हा कार्यक्रम विनामूल्य असून सर्वांसाठी खुला आहे. – **डॉ.प्रसाद पिंपळखरे (पुणे)**

# इमारतीच्या सौंदर्यामागे दडलेली सुरक्षितता

## स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग : दिसत नाही, पण प्रत्येक इमारतीच्या सुरक्षिततेचा खरा आधार



















एखादी नवीन आणि सुंदर इमारत आपल्या समोर उभी राहिली की आपलं लक्ष सर्वप्रथम तिचं बाह्यरूप, रंगसंगती, काच, प्रवेशद्वार, लँडस्केपिंग, टाइल्स, मार्बल, किचन, लाईटिंग किंवा इंटेरिअरकडे जातं.

घर बांधताना आपण अनेकदा विचारतो, कोणती टाइल चांगली दिसेल?, फॅसाड कसा करायचा?, किचन अजून सुंदर कसं करता येईल? पण एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न अनेकदा मागे पडतो.

**आपण जे बांधत आहोत, ते पुढची अनेक वर्षे सुरक्षितपणे उभं राहील याची खात्री कोण करत आहे?**

याच प्रश्नाचं उत्तर आहे, स्ट्रक्चरल इंजिनिअर. आर्किटेक्ट इमारतीला सुंदर आणि उपयोगी आकार देतो. त्या कल्पनेला प्रत्यक्षात सुरक्षितपणे उभं करण्याची जबाबदारी स्ट्रक्चरल इंजिनिअर पार पाडतो.

### इमारतीच्या वजनाचा जमिनीपर्यंतचा (LOAD FLOW PATH) अदृश्य प्रवास

आपण मोठा हॉल बनवतो, लांब बाल्कनी देतो, टेरेसवर पाण्याची टाकी किंवा स्विमिंग पूल ठेवतो. पण स्ट्रक्चरल इंजिनिअरच्या मनात प्रत्येक वेळी एक प्रश्न असतो: या सगळ्याचं वजन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या शक्ती सुरक्षितपणे जमिनीपर्यंत कशा पोहोचणार?

इमारतीचं स्वतःचं वजन असतं. त्यावर माणसं, फर्निचर, पाण्याच्या टाक्या, वाहनं आणि इतर वस्तूंचं वजन येतं. याशिवाय वारा आणि भूकंपामुळे इमारतीवर वेगवेगळ्या दिशांनी शक्ती काम करतात.

**स्लॅब, बीम, कॉलम / भिंती, फाउंडेशन, जमीन**

हा प्रवास डोळ्यांना दिसत नाही. पण इमारत किती सुरक्षित राहणार आहे, हे मोठ्या प्रमाणात याच व्यवस्थेवर अवलंबून असतं.

### स्ट्रक्चरल डिझाईन म्हणजे फक्त बीम आणि कॉलम नाहीत

स्ट्रक्चरल इंजिनिअरचं काम केवळ बीम, कॉलम आणि फाउंडेशनचे आकार ठरवणं नाही. तो संपूर्ण इमारतीकडे एकाच प्रणालीप्रमाणे पाहतो.

इमारतीची उंची, कॉलमची मांडणी, बीमचे स्पॅन, स्लॅब, जिना, फाउंडेशन, जमिनीची क्षमता, वाऱ्याचा परिणाम, भूकंपाच्या वेळी इमारतीचं वर्तन आणि कुठे किती हालचाल होऊ शकते, या सर्व गोष्टींचा विचार डिझाईनच्या वेळी केला जातो.

**सुरक्षिततेशी तडजोड न करता इमारत कार्यक्षम आणि किफायतशीर बनवणं, हेच चांगल्या स्ट्रक्चरल डिझाईनचं वैशिष्ट्य आहे.**

### सॉफ्टवेअर गणित करतं, निर्णय अभियंता घेतो

आज बांधकाम क्षेत्रात आपण अनेकदा ऐकतो, आता सगळं सॉफ्टवेअरमध्ये होतं. हे काही अंशी खरं आहे. आधुनिक स्ट्रक्चरल सॉफ्टवेअरमुळे मोठमोठी गणितं, विश्लेषण आणि डिझाईन अतिशय वेगाने करता येतात.

पण सॉफ्टवेअरला आपण जे सांगतो, त्यावरच ते उत्तर देतं. इमारतीचं योग्य मॉडेल तयार केलं आहे का? योग्य वजनं आणि शक्ती घेतल्या आहेत का? जमिनीची परिस्थिती समजून घेतली आहे का? भूकंपाच्या दृष्टीने योग्य structural system निवडलं आहे का? आणि सॉफ्टवेअरने दिलेला परिणाम प्रत्यक्ष साइटवर व्यवहार्य आहे का? या प्रश्नांची उत्तरं सॉफ्टवेअर स्वतः देत नाही.

**गणित सॉफ्टवेअर करतं; पण निर्णय अभियंत्याचा असतो.**

### चांगलं स्ट्रक्चरल डिझाईन पैसेही वाचवतं

स्ट्रक्चरल इंजिनिअरच्या निर्णयाचा परिणाम फक्त सुरक्षिततेवर होत नाही. त्याचा थेट परिणाम बांधकाम खर्चावरही होतो. किती काँक्रीट लागणार, किती स्टील लागणार, स्लॅब किती जाड ठेवायची, बीम किती खोल असावी, कॉलमचा आकार किती असावा आणि फाउंडेशन किती मोठं असावं, या सर्व गोष्टींचा प्रकल्पाच्या खर्चावर मोठा प्रभाव असतो.

कधीकधी मोठ्या इमारतीत योग्य विश्लेषण करून स्लॅबची जाडी थोडी कमी करता आली, किंवा बीम–कॉलमची मांडणी अधिक कार्यक्षम केली, तरी संपूर्ण प्रकल्पात काँक्रीट आणि स्टीलची लक्षणीय बचत होऊ शकते.

**योग्य ठिकाणी, योग्य प्रमाणात आणि योग्य कारणासाठी साहित्य वापरणं, हेच खरं अभियांत्रिकी.**

### आपला खर्च कुठे होतो आणि बचत कुठे करतो?

घर बांधताना आपण चांगल्या टाइल्स घेतो, महागडा मार्बल घेतो, आकर्षक लाईटिंग करतो, मॉड्युलर किचन करतो आणि सुंदर इंटेरिअरवर खर्च करतो. कारण या गोष्टी आपल्याला रोज दिसतात.

पण स्ट्रक्चरल इंजिनिअरची फी समोर आली की कधीकधी पहिला प्रश्न असतो, थोडं कमी होईल का? इथे थोडा विचार करण्याची गरज आहे. टाइल्स पुढे बदलता येतात, पेंट बदलता येतो, किचन पुन्हा करता येतं आणि फर्निचरही बदलता येतं. पण इमारतीचा सांगाडाच चुकीचा असेल तर दुरुस्ती महागडी, कठीण आणि काही वेळा अशक्यदेखील होऊ शकते.

स्ट्रक्चरल इंजिनिअरने केलेली गणितं आणि तपासण्या बांधकाम पूर्ण झाल्यावर दिसत नाहीत. त्याचं बहुतांश काम काँक्रीटच्या आत कायमचं लपून जातं. कदाचित म्हणूनच त्याच्या कामाची किंमतही अनेकदा डोळ्यांना दिसत नाही.

### इमारतीवर आपण रोज नकळत विश्वास ठेवतो

आपण एखाद्या पुलावरून जाताना त्या पुलाच्या बीममध्ये किती स्टील आहे हे तपासत नाही. हॉस्पिटलमध्ये प्रवेश करताना त्या इमारतीचं भूकंप डिझाईन पाहत नाही. एखाद्या मॉलमध्ये जाताना कॉलमची क्षमता तपासत नाही. आपण फक्त विश्वास ठेवतो की हे स्ट्रक्चर सुरक्षितपणे डिझाईन आणि बांधलं गेलं आहे.

हा विश्वास किती मोठा आहे याची जाणीव अनेकदा एखादी चूक झाल्यावर होते. चुकीच्या डिझाईनचे परिणाम सुरुवातीला क्रॅक्सच्या रूपात दिसू शकतात. पुढे जास्त वाकणं, settlement, अनावश्यक दुरुस्ती खर्च किंवा गंभीर परिस्थितीत structural failure पर्यंत परिस्थिती जाऊ शकते.

**निसर्गाला इमारतीमध्ये किती महागडा मार्बल आहे याचं काही देणंघेणं नसतं. भौतिकशास्त्राचे नियम कोणासाठीही बदलत नाहीत.**

### स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणजे फक्त ड्रॉइंग देणारी व्यक्ती नाही

स्ट्रक्चरल इंजिनिअर निवडताना फक्त फी किंवा सर्वात कमी कोटेशन पाहणं योग्य नाही. त्याचं ज्ञान, अनुभव, आधी केलेलं काम, site understanding, engineering judgement आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जबाबदारी स्वीकारण्याची वृत्ती पाहणं आवश्यक आहे.

**ज्या इमारतीत माझं कुटुंब राहणार आहे, त्या इमारतीच्या सुरक्षिततेची जबाबदारी मी या अभियंत्यावर विश्वासाने सोपवू शकतो का?**

कधी कधी अनुभवी स्ट्रक्चरल इंजिनिअरचा सर्वात मौल्यवान सल्ला फक्त एवढाच असतो, हे करू नका. डिझाईनच्या टेबलवर योग्य वेळी सांगितलेलं हे वाक्य पुढे साइटवर होणारी मोठी चूक, मोठा खर्च किंवा दुर्घटनाही टाळू शकतं.

### आर्किटेक्ट आणि स्ट्रक्चरल इंजिनिअर हे प्रतिस्पर्धी नाहीत

चांगली इमारत तयार करण्यासाठी वास्तुकला आणि स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग एकमेकांसोबत चालली पाहिजेत. आर्किटेक्ट इमारतीची कल्पना करतो; स्ट्रक्चरल इंजिनिअर त्या कल्पनेला सुरक्षितपणे उभं राहण्याची ताकद देतो.

दोघांनी प्रकल्पाच्या सुरुवातीपासून एकत्र काम केलं तर इमारत केवळ सुंदरच नाही, तर अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि किफायतशीरही होऊ शकते.

### शेवटी एकच विचार...

चांगलं स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग फारसं गाजावाजा करत नाही. ते इमारतीच्या भिंतींच्या आत, काँक्रीटमध्ये आणि फाउंडेशनमध्ये शांतपणे आपलं काम करत राहतं. वर्षानुवर्षे त्या इमारतीत राहणाऱ्या लोकांना कदाचित त्याची आठवणही होत नाही.

आणि खरं तर स्ट्रक्चर सुरक्षित असेल, तर स्ट्रक्चरल इंजिनिअरची आठवण होण्याची गरजही पडत नाही. कारण त्याच्या कामाचं खरं यश म्हणजे इमारत वर्षानुवर्षे सुरक्षितपणे उभी राहणं.

इमारतीचं सौंदर्य डोळ्यांना दिसतं; पण तिची सुरक्षितता एका स्ट्रक्चरल इंजिनिअरच्या ज्ञानावर आणि निर्णयावर उभी असते.

**लेखक : इंजि. सलिम मासूम शेख**
(My Bhoomi Consultants)
B.E. Civil, M- Tech Structures
Chartered Engineer, MISSE, MIE, MIV
Cell No. - 8888227786
Off :
Durga Residency,
Savedi, In front of
Yashodanagar Kaman,
Ahilyanagar.
Contact : 7721000042.



AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# कृषी विद्यापिठ संगीत मैफलीत पवन नाईक यांचे वरूण राजाला साकडे





महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठातर्फे बहारदार मराठी, हिंदी, पंजाबी, ऊर्दू व ब्रज भाषेतील गीतांची मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठाने २४ सप्टेंबर रोजी नादब्रह्म संगीतालय, अहिल्यानगर प्रस्तुत व पवन श्रीकांत नाईक (आंतरराष्ट्रीय शास्त्रीय, सुगम व सुफी गायक) निर्मित गाणी तुमची आमची – सुफी दरबार अशी बहारदार मराठी, हिंदी, पंजाबी, ऊर्दू व ब्रज भाषेतील गीतांची मैफल आयोजित केली होती. बळी राजासाठी वरूण देवता (झुले लाल) यांच्यावर आधारीत व भारतीय संस्कृतीतील विविध देवी देवतांना आवाहनात्मक सुख समृद्धीसाठी वैशिष्ट्यपूर्ण रचनांचा या संगीत मैफलीत जाणीवपुर्वक समावेश करण्यात आला होता.

संगीत मैफलीत मुख्य गायक पवन श्रीकांत नाईक, गायिका सरोज पालडीया, कल्याण मुरकुटे व पंकज नाईक (संवादिनी), कुलदीप चव्हाण (बेंजो), स्मिता राणा (सतार), सालोमन पेहेलवान (व्हायोलिन), प्रणव देशपांडे (सिंथेसायझर), सुरज शिंदे (तबला), आदित्य मोरे (ड्रम), नेगीन काजेमी (डफ) तेहरान – ईरान, सहगायक निनाद पारखी, श्रेयस शीत्रे, पवन तळेकर, मूलांशु परदेशी, अथर्व कोरडे, ऋषी त्रिवेदी, आश्लेषा मोरे, जयंत पाठक व विजय जाधव. सूत्रसंचालन दिप्ती शुक्रे व संकेत गांधी तसेच तंत्रज्ञांमध्ये ध्वनी व्यवस्था रवी जाधव व प्रकाश योजना सागर चव्हाण यांचा विशेष सहभाग होता.

पवन श्रीकांत नाईक यांनी मैफलिची सुरूवात गणेश वंदना – गणपती बाप्पा के दरबार याने केली, नंतर अनुक्रमे शिवस्तुती – खंडेरायाच्या लग्नाला, लोक साहित्यातील पट्ठे बापूराव यांनी रचलेली कृष्ण भक्तिपर गवळण – दहिवाली मी गवळ्याची नार या रचना पुर्वार्धात सादर केल्या.

मैफलिच्या उत्तरार्धात सुफी रचनांचा सहभाग होता. सासों की माला, पग़ घुंगरू बांध मिरा नाची थी (सरगम), सेव्हण वाला पीर झुले लाल, किन्ना सोणा तैणू रबने बनाया, तेरे वाज़ो दिल दिया मेहरम, जूर्म सिर्फ ईतना है व मेरे रश्के क़मर या प्रसिद्ध रचना सादर केल्या. मूलांशु परदेशी याने आली भवानी राउळात हि देवी स्तुती व सरोज पालडीया यांच्या बोल आलाप व तानांनी मैफलीत खास रंगत भरली.

याप्रसंगी गायक पवन नाईक यांचे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार व स्वागत केले. याप्रसंगी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, सहाय्यक कुलसचिव व्ही. टी. पाटील, डॉ. अधीर आहेर, डॉ. भगवान देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

# किरण पवार टेबल टेनिस ॲकॅडमीच्या खेळाडूंचे जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये यश



जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये यश मिळविलेले किरण पवार टेबल टेनिस ॲकॅडमीचे खेळाडू.

नगर – सोमैय्या विद्यामंदिर, लक्ष्मीवाडी ता. राहाता येथे २१ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत किरण पवार अक्‍ॅडमीच्या खेळाडूंनी यश संपादन केले. १४ वर्ष मुलांच्या वयोगटात कर्नल परब स्कूलचे रिदान सारडा, समदर्श पुरसवाणी व विहान भगत यांच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत विजय मिळविला व विजयी संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. १७ वर्ष वयोगटात निवड चाचणीत प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूलचा अनुवेद गाडेकर याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धेत अहिल्यानगर, कोपरगाव, संगमनेर, राहाता, प्रवरा, पारनेर, येथील खेळाडूंना सहभाग घेतला होता.

खेळाडूंचे किरण पवार टेबल टेनिस अक्‍ॅडमीच्या सभासदांनी अभिनंदन केले. विजयी खेळाडूंना कर्नल परब स्कूलचे क्रीडा शिक्षक सौरभ सानप, प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूलचे क्रीडा शिक्षक राहुल काळे तसेच एन.आय. एस. टेबल टेनिस मार्गदर्शक राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते, क्रीडा व योग शिक्षक किरण पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# केपीएल कॉर्फ बॉल स्पर्धेत नगरच्या दिशान गांधीची चमकदार कामगिरी

## नेतृत्व केलेल्या सामन्यात विजय मिळवला



नगर – कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया, स्पोर्टी भारत व गेम चेंजर्स आयोजित केपीएल स्पर्धा दिल्लीच्या त्यागराज इन्डोअर स्टेडियममध्ये खेळल्या जात असून अहिल्यानगर येथील दिशान गांधी यांच्या 'दिल्ली धुरंधर' संघाने यशस्वी घौडदौड चालू केली आहे. त्यांनी तेलगू लिजेंड संघाचा पराभव केला. या सामन्यात दिशान गांधी याने नेतृत्व करताना भक्कम संरक्षण करतानाच संघाला निरंतर विजय पथावर ठेवले.

यापुर्वीच्या सामन्यात त्याच्या एका अप्रतिम गोलने प्रेक्षकांना व जिओ हॉट स्टारवर सामना पाहणाऱ्यांना मंत्रमुग्ध केले. याला तब्बल ४७ हजार पेक्षा अधिक व्ह्यूज मिळून हजारावर लाईक्स मिळाले. त्याचे सामने सुजाण प्रेक्षक, कॉर्फबॉल स्नेही परिवार आवर्जुन पाहात आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरचे कोच व इतर वरिष्ठ त्याच्या खेळाचे कौतुक करीत आहेत.

# इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये अभियंता सागर ससाणे




नगर – अहिल्यानगर येथील अभियंता सागर श्रीकांत ससाणे यांची शैक्षणिक, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स २०२६ मध्ये मानाची नोंद करण्यात आली आहे. या सन्मानांतर्गत त्यांना आयबीआर अचिव्हर प्रमाणपत्र, पदक व विशेष गौरवचिन्ह प्रदान करण्यात आले.

सागर ससाणे यांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, अग्निसुरक्षा तसेच विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये एकूण अकरा शैक्षणिक पात्रता संपादन केल्या आहेत. त्यामध्ये यांत्रिकी अभियांत्रिकीतील पदव्युत्तर पदवी, उत्पादन व्यवस्थापनातील व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी पदवी, यांत्रिकी अभियांत्रिकी पदविका, चार्टर्ड अभियंता, तसेच विविध व्यावसायिक पदविका व प्रमाणपत्रांचा समावेश आहे. ज्ञानार्जनाची अखंड जिज्ञासा, औद्योगिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, संशोधनवृत्ती, नाविन्यपूर्ण कार्य आणि समाजोपयोगी योगदान यांची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

# देवस्थान इनाम धारकांचा २७ सप्टेंबरला महामेळावा

## इनामी जमिनी असणाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन



विश्वजीत देशपांडे

नगर – राज्यातील देवस्थान इनाम धारक शेतकऱ्यांच्या इनामी जमिनीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्य सरकारने जून महिन्यात देवस्थान इनाम निर्मूलन कायदा २०२६ प्रस्तावित केला होता, परंतु इनामदारकांनी घेतलेल्या आक्षेपांमुळे सदर कायद्याचा मसुदा सरकारला वापस घ्यावा लागला होता. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने देवस्थान इनाम निर्मूलन कायदा तयार करण्यासाठी राज्याचे महसूल विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली आहे. येत्या डिसेंबर महिन्यात कायदा विधानसभेसमोर येणे अपेक्षित आहे. १९५३ साली इनाम अबोलिशमेंट कमिशन स्थापन झाले होते. त्यावेळी इतर सर्व इनाम जमिनी खालसा करून त्या त्या इनामदारकांच्या नावे केले गेल्या होत्या, परंतु देवस्थान इनाम जमिनी इनाम धारक शेतकऱ्यांना दिल्या गेल्या नाही. राज्यात विविध भागात देवस्थान इनाम संदर्भात विविध कायदे व नियम आहेत. त्यामध्ये एकसूत्रता नाही त्यामुळे राज्यातील देवस्थान इनाम धारक शेतकरी प्रचंड अडचणीत सापडलेला आहे त्यांना पीक कर्ज मिळत नाही पिक विमा मिळत नाही शासनाची कोणतीही मदत मिळत नाही, वारस नोंदणीचा प्रश्न देखील गंभीर झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सरकारने आणलेलं कायदा हा २०११ पूर्वी अनधिकृत ताबा घेतलेल्या लॅण्ड माफियांच्या फायद्याचा होता. त्यामुळे या कायद्याबाबत इनाम धारक शेतकऱ्यांच्या मनात मोठी साशंकता आहे. देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्यावतीने २७ सप्टेंबर रोजी बोरमलनाथ देवस्थान चौफुला दौंड येथे इनाम धारक शेतकऱ्यांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी देवस्थान इनाम कृती समिती प्रयत्नशील असून ब्राह्मण, गुरव, गिरी, गोसावी, बैरागी, वैष्णव, गोंधळी, लिंगायत अशा विविध समाजातील इनामदार शेतकऱ्यांची ही कृती समिती तयार केली आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकार्यांना निवेदन व धरणे आंदोलन समितीच्यावतीने करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा कायदा तयार करण्यासाठी देवस्थान इनाम जमीन कृती समिती कार्यरत असल्याचे समितीचे समन्वयक ॲड. अण्णासाहेब शिंदे, विश्वजीत देशपांडे, ओमप्रकाश गिरी, राजेंद्र बन यांनी सांगितले आहे.

### देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्या मागण्या

महाराष्ट्र राज्यातील देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनींशी संबंधित शेतकरी व मूळ सनदधारकांच्या विविध समस्यांवर तातडीने उपाययोजना व्हावी, यासाठी 'देवस्थान इनाम जमीन कृती समिती'च्यावतीने खालीलप्रमाणे मागण्या सादर करण्यात येत आहेत.

**इनाम खालसा व हक्क पुनर्स्थापित करणे :** इनाम वर्ग–३ जमिनींचा इनाम तात्काळ खालसा करून या जमिनी मूळ सनदधारकांच्या (वंशपरंपरेने सेवा बजावणाऱ्या पुजाऱ्यांच्या/सेवाधाऱ्यांच्या) नावे मालकी हक्काने वर्ग करण्यात याव्यात.

**बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करून ताबा मिळणे :** देवस्थान वर्ग–३ जमिनी या अहस्तांतरणीय स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे या जमिनींचे झालेले सर्व बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करून सदर जमिनींचा ताबा मूळ सनदधारक/सेवाधाऱ्यांकडे पुनश्च सुपूर्द करण्यात यावा.

**वारस नोंदी पुनरारंभ करणे :** सक्षम न्यायालयाचा कोणताही स्थगिती किंवा प्रतिकूल आदेश नसताना रोखण्यात आलेल्या सर्व वारस नोंदी महसूल दप्तरी तात्काळ पूर्ववत सुरू करण्यात याव्यात.

**कब्जेहक्क सदरी पूर्ववत नोंद घेणे :** कोणताही वैध शासकीय आदेश नसताना महसूल अभिलेखात 'कुळचिटणीस' किंवा अन्य इतर हक्कांत घेतलेल्या नोंदी विलोपित (रद्द) करून सदर नावे पूर्ववत 'कब्जेहक्क' सदरी नोंदवण्यात यावीत.


**शासकीय योजनांचा लाभ मिळणे :** इनाम वर्ग–३ धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना इतर सामान्य शेतकऱ्यांप्रमाणेच शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांचा (उदा. पीक विमा, पीक कर्ज व इतर कृषी अनुदान योजना) लाभ मिळण्यासाठी पात्र ठरवण्यात यावे.

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातून** (BPT Act) **वगळणे :** मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (Maharashtra Public Trusts Act, 1950) चा या जमिनींच्या थेट मालकीशी संबंध नसल्यामुळे, देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनी या अधिनियमाच्या कार्यकक्षेतून पूर्णपणे वगळण्यात याव्यात.

**जमीन धारणा मर्यादा** (Ceiling) **रद्द करणे :** देवस्थान इनाम वर्ग–३ जमिनींच्या संदर्भात लादण्यात आलेली १५०० चौ.मी.ची कमाल जमीन धारणा मर्यादा (Ceiling) तत्काळ रद्द करण्यात यावी. प्रलंबित विरासत कार्यवाही तात्काळ निकाली काढणे बाबत शासन निर्णय जाहीर करणे. सदर संवेदनशील व प्रलंबित मागण्यांवर प्रशासकीय पातळीवर त्वरित सकारात्मक निर्णय घेऊन मूळ सनदधारकांना व शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.




# लाळेतून तोंडाच्या कर्करोगाचे संकेत?



नवे संशोधन

भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआटी) इंदूरच्या वैज्ञानिकांनी लाळ आणि तोंडाच्या आतील भागातून घेतलेल्या साध्या स्वॅबच्या नमुन्याद्वारे तोंडाच्या कर्करोगाशी संबंधित आण्विक बदल ओळखण्याची पद्धत विकसित केली आहे. विशेषतः तोंडाच्या कर्करोगाचा धोका अधिक असलेल्या व्यक्तींची नियमित तपासणी आणि देखरेख करण्यासाठी, तसेच भविष्यात कर्करोग होण्यापूर्वी शरीरात होणारे काही आण्विक बदल ओळखण्यासाठी या पद्धतीचा उपयोग होऊ शकतो.

हे संशोधन 'आयआयटी' इंदूरच्या 'मेहता फॅमिली स्कूल ऑफ बायोसायन्सेस अँड बायोमेडिकल इंजिनीअरिंग'चे प्रा. हेमचंद्र झा आणि डॉ. तरुण प्रकाश वर्मा यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या संशोधनात इंदूरच्या 'गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ डेंटिस्ट्री'च्या डॉ. दीपक अग्रवाल यांनीही सहकार्य केले. संशोधकांनी 'ओरल स्क्वॅमस सेल कार्सिनोमा' या तोंडाच्या कर्करोगाच्या सामान्य प्रकाराचा अभ्यास केला. त्याचबरोबर 'ओरल सबम्युकस फायब्रोसिस (ओएसएमएफ) असलेल्या व्यक्तींच्या नमुन्यांचाही अभ्यास करण्यात आला. सुपारी, गुटखा आणि तंबाखूच्या सेवनाशी 'ओएसएमएफ'चा संबंध असू शकतो. काही रुग्णांमध्ये ही स्थिती पुढे कर्करोगात रूपांतरित होण्याचा धोका असतो.

संशोधनासाठी तीन वेगवेगळ्या गटांमधील व्यक्तींचे नमुने घेण्यात आले. यामध्ये निरोगी व्यक्ती, 'ओएसएमएफ'चे रुग्ण आणि तोंडाचा कर्करोग असलेले रुग्ण यांचा समावेश होता. संशोधकांनी लाळेचे नमुने घेतले. त्याचबरोबर तोंडाच्या आतील आवरणातून स्वॅबद्वारे नमुने घेण्यात आले. या नमुन्यांचे 'लिक्विड क्रोमॅटोग्राफी–मास स्पेक्ट्रोमेट्री' (एलसी–एमएस) या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विश्लेषण करण्यात आले. लाळेच्या नमुन्यातून तोंडामध्ये होणाऱ्या विविध रासायनिक बदलांचे संकेत मिळाले, तर स्वॅबच्या माध्यमातून तोंडाच्या आतील पृष्ठभागावरील पेशी आणि प्रथिनांशी संबंधित माहिती मिळाली. दोन्ही नमुन्यांमधून मिळालेल्या माहितीचा एकत्रित अभ्यास केल्याने निरोगी ऊतींपासून कर्करोगपूर्व स्थिती आणि त्यानंतर कर्करोगापर्यंत होणारे आण्विक बदल समजून घेण्यास मदत झाली.

या अभ्यासात चरबीच्या चयापचयाशी संबंधित बदल आढळून आले. त्याचबरोबर शरीरात ऊर्जा निर्माण होण्याची प्रक्रिया, ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस, ऊतींची दुरुस्ती आणि रोगप्रतिकारक यंत्रणेच्या कार्याशी संबंधित विविध आण्विक संकेतही आढळले. भविष्यात या संकेतांचा वापर करून कर्करोगाच्या सुरुवातीच्या अवस्थेतील बदल ओळखणारी सोपी चाचणी विकसित करण्याची शक्यता आहे. भविष्यात कर्करोगाची स्पष्ट लक्षणे दिसण्यापूर्वी शरीरात होणारे काही आण्विक बदल ओळखण्यासही या तंत्रज्ञानाची मदत होऊ शकते. असा संशोधकांचा अंदाज आहे. मात्र प्रत्यक्ष वैद्यकीय वापरासाठी हे तंत्रज्ञान उपलब्ध होण्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर चाचण्या आणि स्वतंत्र वैज्ञानिक पडताळणी आवश्यक आहे.

# मेनोपॉजच्या काळात वाढत्या तक्रारी



'ती'चे आरोग्य

मेनोपॉज (रजोनिवृत्ती) हा प्रत्येक स्त्रीच्या जीवनातील एक नैसर्गिक टप्पा आहे. यात मासिक पाळी थांबते आणि शरीरातील हार्मोन्सच्या पातळीत मोठे बदल होतात. या काळात इस्ट्रोजेन हार्मोनची पातळी कमी होते. त्यामुळे शरीरात अनेक शारीरिक आणि मानसिक बदल दिसून येतात. अनेक महिलांना या काळात हॉट फ्लॅशेस, झोपेची समस्या, मूड बदल, थकवा आणि वजन वाढ यांसारख्या तक्रारी जाणवतात. याशिवाय हाडांची कमजोरी आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोका वाढतो.

या टप्प्यावर औषधांइतकाच महत्त्वाचा भाग म्हणजे योग्य आहार. संतुलित आणि पोषणयुक्त आहार घेतल्यास मेनोपॉजचे दुष्परिणाम कमी करता येतात आणि शरीराला नैसर्गिकरित्या आधार मिळतो. मेनोपॉजदरम्यान इस्ट्रोजेन कमी झाल्यामुळे हाडांची घनता कमी होते आणि 'ऑस्टिओपोरोसिस'चा धोका वाढतो. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन–डी यांचे सेवन वाढवणे आवश्यक असते. दूध, दही, पनीर आणि इतर दुग्धजन्य पदार्थ हे कॅल्शियमचे उत्तम स्रोत आहेत. तसेच पालक, मेथी, कोथिंबीर यांसारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्येही कॅल्शियम आढळते. बदाम, तीळ आणि अंजीर यांसारख्या सुक्या मेव्यामध्येही हाडांना मजबुती देणारे घटक असतात. सूर्यप्रकाशात काही वेळ घालवणे किंवा व्हिटॅमिन–डी युक्त आहार घेणे महत्त्वाचे आहे. यामुळे हाडे मजबूत राहतात आणि फ्रॅक्चरचा धोका कमी होतो.

मेनोपॉजनंतर महिलांमध्ये हृदयविकाराचा धोका वाढतो. कारण इस्ट्रोजेन हार्मोन हृदयाचे संरक्षण करण्यास मदत करतो. त्यामुळे या काळात अक्रोड, जवसाचे बियाणे आणि मासे यांसारखे ओमेगा–३ फॅटी ॲसिड्सयुक्त पदार्थ हृदयासाठी खूप उपयुक्त असतात. तसेच संपूर्ण धान्ये, ओट्स, ब्राऊन राईस आणि फायबरयुक्त आहार कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. तळलेले पदार्थ, ट्रान्स फॅट आणि जास्त साखर असलेले पदार्थ टाळणे आवश्यक आहे. आहारात फळे आणि भाज्यांचा नियमित समावेश केल्याने रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारून रक्तदाब नियंत्रणात राहतो. हृदय निरोगी ठेवण्यासाठी आहारात योग्य बदल करणे खूप महत्त्वाचे आहे. मेनोपॉजच्या काळात काही नैसर्गिक पदार्थ हार्मोनल संतुलन राखण्यास मदत करतात. टोफू, सोया दूध आणि सोयाबीन यामध्ये फायटोएस्ट्रोजेन्स असतात. ते इस्ट्रोजेनसारखे काम करतात. हे घटक हार्मोनल बदलांमुळे होणारे त्रास कमी करण्यास मदत करतात. तसेच जवसाचे बियाणे, तीळ आणि चणे यामध्येही नैसर्गिक हार्मोन संतुलन राखणारे घटक असतात. या पदार्थांचे नियमित आणि योग्य प्रमाणात सेवन केल्यास मूड स्विंग्स, गरम लाटा आणि थकवा कमी होऊ शकतो.

मेनोपॉजदरम्यान चयापचय मंदावते. त्यामुळे वजन वाढण्याची शक्यता जास्त असते. या काळात पचन सुधारण्यासाठी आणि वजन नियंत्रित ठेवण्यासाठी फायबरयुक्त आहार अत्यंत उपयुक्त ठरतो. फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये आणि डाळी यांचा आहारात समावेश केल्यास पचन सुधारते आणि दीर्घकाळ पोट भरल्यासारखे वाटते. प्रथिनेदेखील शरीरासाठी अत्यंत महत्त्वाची असतात कारण ती स्नायू मजबूत ठेवतात आणि शरीराची ताकद टिकवतात. अंडी, डाळी, कडधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थ हे प्रथिनांचे चांगले स्रोत आहेत. साखर आणि जास्त प्रक्रिया केलेले पदार्थ टाळल्यास वजन नियंत्रित ठेवता येते. योग्य आहारासोबत हलका व्यायाम आणि चालणे यामुळे शरीर अधिक सक्रिय आणि निरोगी राहते. मेनोपॉज हा आजार नसून, एक नैसर्गिक जैविक टप्पा आहे. या काळात योग्य आहार घेतल्यास अनेक शारीरिक आणि मानसिक त्रास कमी करता येतात.

# डास चावताहेत?




विकार

ऋतूबदलाच्या काळात डास मोठ्या प्रमाणावर सक्रिय होतात. प्रजननाच्या काळात डासांच्या संख्येत प्रचंड वाढ होते. डासांमुळे डेंग्यू, मलेरियासारख्या विकारांचा धोका बळावतो. डास चावल्यानंतर शरीरावर व्रण उठतात. बऱ्याचजणांची त्वचा संवेदनशील असते. अशा लोकांना डास कवा किटकदंशानंतर बराच त्रास होतो. अंगावर पुरळ उठतं. अशा वेळी डासविरोधी क्रीम्सचा वापर करायचा नसेल तर नैसर्गिक उपाय मदतीला येऊ शकतो. केळ्याच्या सालीचा वापर करून तुम्ही डास चावल्यामुळे होणारा त्रास कमी करू शकता.

* केळ्याच्या सालीत दाह कमी करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे डास चावल्यानंतर उठणाऱ्या लालसर पुरळाची तीव्रता कमी होऊ शकते. केळ्याची साल, गुलाबपाणी आणि बर्फ यांचा एकत्रित वापर करून तुम्ही बरेच लाभ मिळवू शकता. यासाठी केळ्याची साल घ्या. त्यावरचा पांढरा भाग खरवडून काढा. कुस्करून घ्या. त्यात गुलाबपाणी घाला. हे मिश्रण एकजीव करा. याची जाडसर पेस्ट तयार व्हायला हवी. ही पेस्ट पुरळ उठलेल्या भागावर लावा. यानंतर बर्फाचे तुकडे एका कापडात बांधून घ्या. हा बर्फ पेस्ट लावलेल्या भागावर लावा. साधारण पंधरा मिनिटांनी हा उपाय करत राहा. मग पेस्ट लावलेला भाग पाण्याने धुवून टाका. कोरडा करा.

* केळ्याचं साल आणि ग्लिसरीन यांच्या मिश्रणामुळेही तुम्हाला आराम मिळू शकेल. आधीप्रमाणे केळ्याच्या सालीतला पांढरा भाग काढून घ्या.

# नैराश्य दूर करण्यासाठी मांजर पाळा!



आयुर्वेद

बऱ्याच लोकांना मांजरे पाळायला आवडतात. आता मांजरांचा वापर अल्झायमर आणि डिमेंशियाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी केला जाऊ शकतो. अलीकडेच एक अभ्यास करण्यात आला. त्यात दिसून आले की, मांजरांमधील डिमेंशिया हा आजार मानवांमध्ये होणाऱ्या अल्झायमर आजारासारखाच आहे. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की, मांजरे अल्झायमर आणि डिमेंशियाच्या उपचारात खूप उपयुक्त ठरू शकतात.

**डिमेंशिया आणि अल्झायमरशी मांजरांचा संबंध**

हे संशोधन ब्रिटनमधील एडिनबर्ग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी केले आहे. त्यांनी असे निरीक्षण केले की डिमेंशिया असलेल्या मांजरांच्या मेंदूमध्ये एक विशेष प्रकारचे विषारी प्रथिन जमा होते, ज्याला अमायलॉइड–बीटा म्हणतात. हे प्रथिन मानवांमध्ये अल्झायमर आजाराचे मुख्य कारण मानले जाते. 'युरोपीयन जर्नल ऑफ न्यूरोसायन्स'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात असे म्हटले आहे की, मांजर आणि मानवांच्या या आजारात अनेक समानता आहेत. शास्त्रज्ञांनी असे निरीक्षण केले आहे की, वृद्ध मांजरांना डिमेंशिया होतो, तेव्हा त्यांचे वर्तन बदलते. यामुळे ते वारंवार 'म्याऊ' करतात. त्या गोंधळलेल्या स्थितीत दिसतात. त्याच वेळी त्यांची झोपदेखील वारंवार खंडित होते. ही सर्व लक्षणे मानवांमध्ये होणाऱ्या अल्झायमर रोगासारखीच आहेत. अशा परिस्थितीत, शास्त्रज्ञांना वाटते की, मांजरांचा अभ्यास करून अल्झायमर रोग चांगल्या प्रकारे समजू शकतो.

**संशोधनात काय केले?**

या अभ्यासासाठी शास्त्रज्ञांनी २५ मृत मांजरांच्या मेंदूवर संशोधन केले. यापैकी काही मांजरे डिमेंशियाने ग्रस्त होत्या. त्यांनी एका शक्तिशाली सूक्ष्मदर्शकाच्या मदतीने मांजरांच्या मेंदूची तपासणी केली आणि असे आढळले, की वृद्ध आणि डिमेंशियाने ग्रस्त मांजरांच्या मेंदूमध्ये अमायलॉइड–बीटा प्रथिनांचा साठा आहे. हा साठा 'सायनॅप्स'मध्ये दिसून आला. सायनॅप्स मेंदूच्या पेशींमध्ये संदेश पाठवण्याचे काम करतात. ते निरोगी मनासाठी खूप महत्वाचे आहेत. त्यांच्यामध्ये अमायलॉइड–बीटा जमा होतो, तेव्हा ते योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत. यामुळे स्मरणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता कमी होते. अल्झायमर रोगातही हीच समस्या दिसून येते.

# मित्र जोडा, आजार पळवा!



कुठे चुकतो आपण?

अनेकांच्या 'सोशल मीडिया' अकाउंटवर कमेंट्स आणि लाईक्सचा वर्षाव असतो, त्यांच्या मित्रांची, फॉलोअर्सची यादी मोठी असते. असे असले अनेकजण अडचणीच्या काळात स्वत:ला एकटे पडल्याचे अनुभवतात. 'न्यूज कॉर्प'च्या 'ग्रोथ डिस्टिलरी' आणि 'मेडिबँक'च्या नव्या अभ्यासात हे भयावह वास्तव समोर आले आहे. त्यामुळे डिजिटल गर्दीमागे लपलेले एकटेपण उघड झाले आहे. या अभ्यासानुसार, मानसिक स्थिती चांगली असणाऱ्यांकडे सरासरी पाच कवा त्याहून जास्त मित्र असल्याचे स्पष्ट झाले आहे; पण मानसिकदृष्ट्या संघर्ष करत असलेल्यांकडे फक्त तीनच मित्र असतात. ही लहानशी वाटणारी दोन मित्रांची तफावत मोठा परिणाम करणारी ठरते. त्यामुळे माणूस 'मी परिस्थिती हाताळू शकतो' या भावनेपासून 'कोणाला त्रास नको, म्हणून मी शांत राहतो' या अवस्थेत पोहोचतो.


सोबत असूनही दूर का वाटते?

आजचे 'सोशल लाइफ' बिझी असले, तरे ते वरवरचे आहे. अनेकजण इव्हेंटला जातात, ग्रुप चॅटमध्ये सक्रिय असतात, त्यांचे शेकडो मित्र असतात; पण एखादे संकट आले, की अशा व्यक्ती कुणालाही फोन करणे टाळतात. अशा वेळी आपण हक्काने आपली समस्या सांगू शकू असे मित्र आपल्याकडे नसतात. आपली समस्या सांगून आपण इतरांवर ओझे होऊ नये, किंवा त्यांना आपण दुर्बल असल्याचे दिसू नये म्हणून टाळण्याचा प्रयत्न करतो. अशा तणावपूर्ण परिस्थितीमध्ये आपल्याला कुणी काही विचारलेच तर 'फक्त थोडे थकलोय' कवा 'फार बिझी असतो' असे सांगून आपण वेळ मारून नेतो.

खरे नाते काय असते?

खरे नाते म्हणजे ५० कवा १०० मित्र असणे नव्हे, तर एखादी अशी व्यक्ती, जी नि:संकोचपणे तुमचा फोन उचलेल, तुमच्या मदतीला येईल. त्याचप्रमाणे तुम्हीही त्याच्यासाठी कधीही, वेळ न पाहता मदतीसाठी पोहोचाल.

# मधुमेहींसाठी पेयांचे पर्याय



काय खावं?

बऱ्याच पेयांमध्ये भरपूर साखर असते. त्यामुळे मधुमेहींना काही पेयं टाळावी लागतात. त्यांना बरेचदा पाण्यावरच समाधान मानावं लागतं. पण मधुमेहींसाठी आरोग्यदायी पेयांचे काही पर्याय आहेत. त्याविषयी...


* मधुमेहग्रस्तांना भाज्यांचे रस पिता येतील. पालक, गाजर, टोमॅटो यांचे रस खूपच आरोग्यदायी असतात. यातून आवश्यक ते पोषक घटकही मिळतात. आवडीच्या भाज्यांचे रसही पिता येतील.

* मधुमेही कॉफी पिऊ शकतात. कॉफीमुळे मधुमेह होण्याची शक्यता कमी होते, असं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे. अर्थात कॉफी मर्यादित प्रमाणात प्यायला हवी. शिवाय त्यात साखरेचं प्रमाणही कमी असावं.

* हर्बल टी हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे हर्बल टी मिळतात. या चहामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहायला मदत होते. डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य तो हर्बल टी प्या.

* मधुमेहींनी आहारात दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करायला हरकत नाही. त्यांनी कमी कॅलरी आणि फॅटयुक्त दूध प्यावं. डॉक्टरांच्या सल्ल्याने दुधाचं प्रमाण ठरवता येईल.

# सुप्त विषाणू सक्रिय होण्याची शक्यता



सुप्त धोका


गंभीर स्वरूपाचा कोविड–१९ संसर्ग झालेल्या काही रुग्णांच्या शरीरात दीर्घकाळ सुप्त अवस्थेत असलेले विषाणू पुन्हा सक्रिय होऊ शकतात, असा दावा एका नव्या संशोधनातून करण्यात आला आहे. 'नेचर' या प्रसिद्ध वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, या विषाणूंच्या पुनर्सक्रियतेमुळे फुफ्फुसांच्या ऊती अधिक संवेदनशील आणि कमकुवत होण्याची शक्यता आहे.

संशोधकांच्या मते, गंभीर कोविड संसर्गामुळे शरीरात दीर्घकाळ दाहक प्रक्रिया सुरू राहू शकते. या प्रक्रियेमुळे शरीरात आधीपासून सुप्त अवस्थेत असलेले काही विषाणू पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता असते. यामध्ये एपस्टीन–बार विषाणू, साइटोमेगालोव्हायरस आणि ॲनेलोव्हिरिडे कुटुंबातील विषाणूंचा समावेश होतो. काही विषाणूंचा संसर्ग झाल्यानंतर ते शरीरातून पूर्णपणे नष्ट होत नाहीत. ते शरीरातील पेशींमध्ये सुप्त अवस्थेत राहतात. सामान्य परिस्थितीत रोगप्रतिकारक यंत्रणा त्यांना नियंत्रणात ठेवते; मात्र गंभीर संसर्ग किंवा शरीरातील रोगप्रतिकारक प्रक्रियेत मोठे बदल झाल्यास हे विषाणू पुन्हा सक्रिय होऊ शकतात.

गंभीर कोविड संसर्गाच्या काळात शरीरात मोठ्या प्रमाणात दाह निर्माण होतो. या दाहामुळे सुप्त विषाणूंच्या पुनर्सक्रियतेला चालना मिळू शकते, असे संशोधकांचे म्हणणे आहे. सुप्त विषाणू पुन्हा सक्रिय झाल्यामुळे फुफ्फुसांच्या ऊतींमध्ये सौम्य स्वरूपाचा दाह आणि ताण दीर्घकाळ राहू शकतो. त्यामुळे संसर्गानंतर फुफ्फुसांची स्वत:ची दुरुस्ती करण्याची क्षमता प्रभावित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत भविष्यात इन्फ्लूएंझा किंवा अन्य श्वसनसंसर्ग झाल्यास फुफ्फुसांवर त्याचा अधिक गंभीर परिणाम होऊ शकतो का, याचा अभ्यास वैज्ञानिक करत आहेत. कोविडनंतर काही व्यक्तींमध्ये दीर्घकाळ जाणवणारा थकवा, श्वास लागणे आणि अशक्तपणा यामागे सुप्त विषाणूंची पुनर्सक्रियता हा एक संभाव्य घटक असू शकतो, असे संशोधनातून सूचित झाले आहे.

आहारामध्ये हिरव्या भाज्या, हळद, अँटिऑक्सिडंट्सयुक्त फळे आणि सुकामेवा यांचा समावेश करणे उपयुक्त ठरू शकते. फुफ्फुसांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने हलके श्वसनाचे व्यायाम किंवा प्राणायाम करता येऊ शकतो. सर्दी, खोकला किंवा कफ झाल्यास स्वत:हून औषधे घेण्याऐवजी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. विशेषत: श्वास घेण्यास त्रास वाढत असल्यास किंवा फुफ्फुसांशी संबंधित लक्षणे गंभीर होत असल्यास तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# 'बीएमआय'वरून निरोगी ठरवणे अवघड




आरोग्यमंत्र

आपलं वजन योग्य आहे की नाही, हे पाहण्यासाठी बहुतेकजण बीएमआय (बॉडी मास इंडेक्स) काढतात. डॉक्टरही सुरुवातीला 'बीएमआय' (बीएमआय) तपासतात; पण फक्त 'बीएमआय' पाहून एखादी व्यक्ती पूर्णपणे निरोगी आहे की नाही, हे ठरवता येत नाही. कारण 'बीएमआय' हे केवळ तुमची उंची आणि वजन यावर आधारित असतं. शरीरात किती चरबी आहे, ती कुठे साठली आहे किंवा स्नायू किती आहेत, याची माहिती 'बीएमआय'मधून मिळत नाही.

कंबरेचा आणि नितंबाचा घेर मोजून काढले जाणारे 'वेस्ट टू हिप रेशो' (कंबर–नितंब गुणोत्तर) हे मोजल्याने शरीरात चरबी कुठे साठली आहे, याची कल्पना देते. विशेषतः पोटाभोवती साठलेली चरबी आरोग्यासाठी अधिक धोकादायक मानली जाते. पोटाच्या आत अवयवांभोवती साठणाऱ्या चरबीला 'व्हिसरल फॅट' म्हणतात. ही चरबी दिसत नसली, तरी ती शरीरासाठी हानिकारक असते. यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, फॅटी लिव्हर, पीसीओएस, स्लीप ॲप्निया आणि काही प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढू शकतो.

काही लोक दिसायला सडपातळ असतात आणि त्यांचा 'बीएमआय' देखील सामान्य असतो; पण त्यांच्या पोटाभोवती चरबी जास्त असल्यामुळे त्यांना आरोग्याचे धोके असू शकतात. यालाच 'थिन आऊटसाईड, फॅट इनसाईड' असे म्हणतात. म्हणजे बाहेरून बारीक; पण शरीराच्या आत चरबी जास्त. दुसरीकडे, एखाद्या व्यक्तीचा 'बीएमआय' जास्त असला, तरी त्याच्या शरीरात स्नायूंचे प्रमाण अधिक असल्यास तो तुलनेने निरोगी असू शकतो. म्हणूनच आजकाल डॉक्टर केवळ 'बीएमआय'वर अवलंबून राहत नाहीत. 'बीएमआय' सोबत कंबरेचा घेर, कंबर–नितंब गुणोत्तर, शरीरातील चरबीचे प्रमाण आणि इतर आरोग्य समस्या यांचाही विचार केला जातो.

कंबर–नितंब गुणोत्तर कसे मोजावे?


* महिलांसाठी: कंबरेचा घेर / नितंबाचा घेर = ०.८५ पेक्षा कमी असणे चांगले.

* पुरुषांसाठी: कंबरेचा घेर / नितंबाचा घेर = ०.९० पेक्षा कमी असणे चांगले.

लठ्ठपणावर उपचार करण्याचा उद्देश केवळ वजन कमी करणे हा नसतो. शरीरातील धोकादायक चरबी कमी करणे, जीवनशैलीत सुधारणा करणे आणि भविष्यातील आजारांचा धोका कमी करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. वजन काट्यावर दिसणारा आकडा हा तुमच्या आरोग्याचा आरसा नसतो. तुमच्या शरीरात चरबी कुठे साठली आहे, हे जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

## महत्त्वाचे काही...


### दीर्घायुषी व्हायचंय... कमी खा!



प्रत्येकालाच दीर्घायुषी व्हायचं आहे. दीर्घायुषी होण्यासाठी नियमित व्यायाम केला जातो, पोषक आहार घेतला जातो. यासोबतच शरीरातला दाह कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा. भरपूर जगायचं असेल तर कमी खा, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. कमी कॅलरी शरीरात गेल्यास वार्धक्यात होणाऱ्या आजारांची तीव्रता कमी करता येते आणि तुम्ही अधिक काळ जगू शकता, असं संशोधकांचं म्हणणं आहे. सेल नावाच्या जर्नलमध्ये हा शोध प्रसिद्ध झाला आहे. अमेरिका आणि चीनमधल्या शास्त्रज्ञांनी याबाबत निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष काढण्यासाठी उंदरांवर संशोधन करण्यात आलं. त्यासाठी वेगवेगळ्या पेशींचा अभ्यास करण्यात आला.

## डोळ्यांचं आरोग्य

### डोळे सुजतात?



कॉम्प्युटर व्हिजन सड्रोममुळे डोळ्यांवर परिणाम होतोच, शिवाय आपली उत्पादकताही कमी होऊ लागते. सध्याच्या काळात आपली नजर कॉम्प्युटर, लॅपटॉप कवा स्मार्टफोनच्या स्क्रीनवर अधिक काळ खिळलेली असते. याच कारणामुळे जगभरातल्या ६० दशलक्ष लोकांना कॉम्प्युटर व्हिजन सड्रोम जडला आहे. अंधुक दिसणं, डोळे थकणं, मान अवघडणं, सततची डोकेदुखी ही कॉम्प्युटर व्हिजन सड्रोमची लक्षणं आहेत. या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्या. कॉम्प्युटर व्हिजन सड्रोमचे बरेच दुष्परिणाम आहेत. त्यामुळे तातडीने उपचार घेणं गरजेचं आहे.

## जपणूक त्वचेची

### लाभ मॉईश्चरायजरचे

तेलकट त्वचेवर मॉईश्चरायजर लावणं गरजेचं असतं का, असा प्रश्न अगदी सहज उपस्थित होतो. मात्र प्रत्येक प्रकारच्या त्वचेला मॉईश्चरायजरची गरज असते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्वचा कोरडी पडल्यास बरेच आजार होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी मॉईश्चरायजरचा वापर करायला हवा. मॉईश्चरायजरमुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो. त्वचेला थेट पाणी मिळतं. त्वचा मुलायम राहते. मॉईश्चरायजरमुळे त्वचेवर मऊ थर तयार होतो. त्यामुळे त्याचा वापर करायला हवा.



## आजीबाईचा बटवा

### बेदाणे भिजवलेलं पाणी प्यायल्याने...



बेदाणे भिजवलेलं पाणी आरोग्यासाठी खूप लाभदायी आहे. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी बेदाणे भिजवलेलं पाणी प्यायला हवं. या पाण्यात बरेच पोषक घटक आणि जीवनसत्त्वं असतात. या पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातले विषारी घटक बाहेर टाकले जातात. साधारण आठवडाभर या पाण्याचं सेवन करत राहिल्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारतं. यासोबतच यकृतही स्वच्छ होतं. तसंच त्याची कार्यक्षमताही वाढते. यासाठी दोन कप पाण्यात १५० ग्रॅम बेदाणे भिजवून ठेवा. बेदाणे भिजवण्याआधी पाणी उकळून घ्या. बेदाणे रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी पाणी गाळून घ्या.





विशाल गणपती मंदीर येथे आरती करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व त्यांच्या पत्नी. समवेत ॲड. अभय आगरकर, संगमनाथ महाराज व इतर. शेजारील छायाचित्रात गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेले मुलींचे लेझीम पथक. गणेश विसर्जन मिरवणुकीत गणपती बाप्पावर फुलांचा वर्षाव करण्यात आला.

# डीजेच्या दणदणाटात बाप्पाला अखेरचा निरोप

### पोलिसांकडून ४ डीजे जप्त; मिरवणुका रेंगाळल्या

नगर – गणेशोत्सवात कर्णकर्कश डिजे न लावता पारंपारिक वाद्यांच्या तालावर गणेश विसर्जन मिरवणुका काढाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी गणेशभक्तांना केले होते. पोलीस अधीक्षकांनी थेट डीजे जप्तीचा इशाराही दिला होता. मात्र, प्रशासनाच्या डीजेमुक्तीच्या प्रयत्नांना हरताळ फासत डीजेच्या दणदणाटात बाप्पाला अखेरचा निरोप देण्यात आला. पोलिसांनी डीजेंवर कारवाई करीत ४ डीजे जप्त करण्यात आले. या वर्षी प्रथमच विशाल गणपतीची मिरवणूक रेंगाळल्यामुळे रात्री उशिरा बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

२५ सप्टेंबर रोजी सकाळी १० जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते सपत्निक विशाल गणेश मंदिरात उद्यापन आरती करण्यात आली. त्यानंतर विविध धार्मिक विधी पार पडले. दुपारी आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. त्यानंतर विशाल गणपतीची मिरवणूक सुरु झाली. सर्वात पुढे विशाल गणपतीची मिरवणूक व त्यामागे इतर १२ मंडळाच्या मिरवणुका होत्या. विशाल गणपतीची मिरवणूक पारंपारिक वाद्याच्या गजरात काढण्यात आली. झांज पथक, ढोल पथक आणि लेझिम पथकांनी या मिरवणुकीत रंगत आणली. विशाल गणपतीची मिरवणूक इतिहासात प्रथमच रात्री ९ वाजून २२ मिनिटांनी दिल्लीगेट वेशीच्या बाहेर पडली. दरवर्षी ६ वाजेदरम्यान ही मिरवणूक दिल्लीगेटच्या बाहेर येते. यंदा मात्र, सुमारे साडेतीन तास ही मिरवणूक रेंगाळली. त्यामुळे इतर मंडळाच्या मिरवणुकाही रेंगाळल्या. रात्री १० वाजता विशाल गणपती मंडळाच्या बाप्पाचे विसर्जन झाले. त्यानंतर इतर मंडळाचे विसर्जन झाले. मिरवणुकांसाठी रात्री बारा वाजेपर्यंतच परवानगी होती. रात्री १२ वाजता अनेक मंडळाच्या मिरवणुका चितळेरोड पर्यंत पोहोचलेल्या होत्या. त्यामुळे पोलिसांनी वाद्यांचा आवाज बंद करण्याचे निर्देश मंडळांना दिले. त्यानंतर मंडळांनी गणेशाचे रात्री उशिरा विसर्जन केले.

दरम्यान विशाल गणपती देवस्थान वगळता इतर मंडळांनी डीजेच्या तालावर मिरवणुका काढल्या होत्या. पोलिसांकडून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे मिरवणुकीवर वॉच ठेवला जात होता. तसेच मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. साध्या वेशातील पोलीसही मिरवणुकीत होते. त्यामुळे मिरवणुका शांततेत पार पडल्या. कोठेही काहीही अनुचित प्रकार घडला नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, प्रशासनाचे डीजेमुक्तीचे आवाहन मोडीत काढून डीजेच्या तालावर मिरवणुकीत नाचण्याचा आनंद गणेशभक्तांनी घेतला. आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी ४ डीजे जप्त केले असून, गुन्हे दाखल करण्यात आल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.



## गुरुवाणी – ६१

### देव तेथेची जाणावा..

'बिना समीक्षा करे किसी को प्यार करना आसान है, लेकीन जानने के बाद प्यार करना मुश्किल है'. तीर्थंकरांकडे समीक्षा करण्याची प्रज्ञा आहे. त्यांच्या विचारांमध्ये समृद्धता आहे. विचार श्रीमंत असतील तर श्रीमंत होण्यास वेळ लागत नाही. आपण विचारांनीच गरीब आहोत. तीर्थंकर जितकी समिक्षा करतात तेवढी आनंदाचीच अनुभूती घेतात. ते कायम रक्षक बनून राहतात. दुःखी होऊन काय मिळणार आहे? जो व्यक्ती दुःखी होतो तो स्वतःसाठी पापाचे बीज लावतो. भविष्यात दु:ख नको असेल तर दुःखी होऊ नका. गोशालक काय करणार हे माहीत असूनही भगवान महावीर कधी त्रासले नाहीत. सुधर्मा स्वामी सांगतात, 'तीर्थंकरांना कोणत्याही गोष्टीची सवय नाही'. पण आपली दृष्टी सिमित असते. आपल्याला फक्त विषारी चंडकौशिक दिसतो, पण त्याच्यातील योगी दिसत नाही. म्हणून सवयींपासून बाहेर निघाल तेव्हा संयम येईल. आपण स्वतः रस्ते तयार करून त्यावर चालण्याचा आनंद काही वेगळाच असतो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी युद्धाची पारंपरिक पद्धत बदलून गनिमी कावा रणनीती अवलंबली. ते प्रवाहाविरुद्ध गेले. त्यांनी नवीन रस्ते तयार केले. अनंत दृष्टीसाठी परंपरेच्या बेड्या तोडाव्या लागतील. मोकळ्या आकाशात उडायचे तर पिंजरा तोडावाच लागेल. पक्षी पिंजऱ्यात सुरक्षित असतो पण आनंदी नसतो. तीर्थंकरांनी काळानुरूप नवीन परंपरा निर्माण केली. जेव्हा ज्योत प्रज्वलित होते तेव्हा प्रकाशही निर्माण करते आणि अंधारही दाखवते. तीर्थंकर प्रकाश निर्माण करतात आणि अंधकारही दाखवतात. यावर्षी एल निनो मुळे पावसावर परिणाम होणार हे तज्ज्ञांनी चार पाच महिने आधीच सांगितले होते, पण त्यावर उपाययोजना आता सुरू करण्यात येत आहेत. लख्ख प्रकाश असतानाच अंधकाराला सामोरे जाण्याची तयारी केली पाहिजे. माझ्याविषयी गुरूदेवांकडे अनेक जण तक्रारी करायचे पण गुरूदेवांच्या माझ्यावरील प्रेमात कधीच अंतर आले नाही. एकदा एक संत पाण्यात स्नान करत असताना एक विंचू पाण्यात पडतो. संत त्या विंचूला उचलून पाण्याबाहेर काढतात. पण तो संतांना डंख मारतो. असे अनेक वेळा होते. एक जण संतांना म्हणतो, 'तुम्ही असे का करत आहात? विंचू तुम्हाला डंख मारत आहे'. तेव्हा संत म्हणतात, 'तो विंचू असूनही आपला स्वभाव सोडत नाही. मी तर संत आहे, मग मी माझा स्वभाव का सोडू'? अशा संतांबाबत तुकाराम महाराज म्हणतात, 'देव तेथेची जाणावा'.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# देवी पार्वतीनेच सुरू केला मृत्तिकेच्या गणपतीचा पूजाविधी

### गणेश आराधना विघ्ने घालवून आनंद मिळवून देणारी : प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके

भिंगार – हिमाचलाची कन्या देवी पार्वतीने भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गजाननाची मृत्तिकेची मूर्ती तयार करून तिचे यथाविधी पूजन केले. पूजेने मूर्ती सजीव झाली. तेव्हापासून गणेशाचा जन्म झालेल्या भाद्रपद शुद्ध चतुर्थी या तिथीस गणेशाचे पूजन भक्तिभावाने करण्यास सुरुवात झाली, असे प्रतिपादन प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

विश्व हिंदू परिषदेच्या दुर्गावाहिनी जिल्हा शाखेतर्फे जिल्हा संयोजिका श्रीमती जयश्रीताई पोटे यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या प्रवचन सोहळ्यात ते बोलत होते. जयश्रीताई पोटे यांनी स्वागत केले. विहिंपचे विभाग मंत्री सुनील खिस्ती आणि अशोक शहापुरे यांच्या हस्ते मिलिंद चवंडके यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विहिंप मातृशक्ती जिल्हा संयोजिका सौ.हिराताई शहापुरे, मयुरी जोशी, आरती वाघ, श्रेया कदम, पत्रकार सुधीर कुलट, तेजस पोटे, संजय सपकाळ, जनार्दन तांबे, मिलिंद फुंदे, बलराम वाघ, प्रसाद कदम, निखिल शेंडे यांच्यासह द्वारकाधीश कॉलनीतील भाविक उपस्थित होते.




विहिंपचे विभाग मंत्री सुनील खिस्ती आणि अशोक शहापुरे यांच्या हस्ते मिलिंद चवंडके यांना सन्मानित करण्यात आले.

मिलिंद चवंडके पुढे म्हणाले, देवाधिदेव महादेवांनी गणपती मंत्राचे सामर्थ्य भृगूऋषींना सांगताना गणपतीचा सहा अक्षरी आणि एकाक्षरी मंत्र श्रेष्ठ आहे. गणपती मंत्राचे अनुष्ठान विघ्न घालवून इष्ट फल देणारे आहे, असे सांगितले. गणेश सहस्रनामाचा जप इच्छापूर्तीचा आनंद मिळवून देतो. भगवान शंकराने गणेश सहस्रनामाचा पाठ आणि एकाक्षर मंत्राचा जप करत त्रिपुरासुराचा वध कार्तिक शुद्ध पौर्णिमेला सायंकाळी केला. ती स्मृती म्हणून दीपोत्सव साजरा केला जातो. हिमालयाने पार्वतीला भगवान शंकराच्या प्राप्तीसाठी वरद गणेशाचे व्रत करायला सांगितले होते.

संकष्टी चतुर्थीचे माहात्म्य, अंगारकी चतुर्थीचे माहात्म्य, निवडलेल्या २१ दुर्वांचे माहात्म्य, सर्व विघ्ने घालवणारी गणपतीची सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्ण, लंबोदर, विकट, विघ्ननाशक, गणाधिप, धूम्रकेतू, गणाध्यक्ष, भालचंद्र व गजानन ही १२ नावे, ढुंढिराजनामाचे माहात्म्य, देवी पार्वतीच्या श्वासोच्छ्वासाबरोबर नेत्रातील अलौकिक तेजामधून प्रगटलेला वक्रतुंड, उंदराचे रूप घेऊन आलेल्या क्षम आणि कुशल या दैत्यांना बाल गणेशाने पाळण्यात असताना गतप्राण केले, क्रौंच गंधर्व शापामुळे उंदीर होऊन गणपतीचे वाहन झाला, या गणेश पुराणातील कथा सांगून मिलिंद चवंडके यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. ग्रामदैवत विशाल गणपती नाथपंथी असून तीन हातांनी भाविकांना आशीर्वाद देणारा आहे. पारनेरच्या गणेशखिंडीतील गणपती अंगारकी चतुर्थीचे महत्त्व सांगतो. आव्हाने गावात निद्रिस्त गणपती भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नवनाथांमधील श्रीकानिफनाथ गणेश मंत्रांचा जप करतच प्रगट झाले, असे वास्तव श्रोत्यांच्या पुढ्यात ठेवत मिलिंद चवंडके यांनी गणपतीचे माहात्म्य निवेदन केले. गणपतीची महाआरती करून प्रसाद वाटपाने सांगता करण्यात आली.



## गुरुवाणी – ६२

### अज्ञानाला जिंका...

सुधर्मा स्वामी आपल्या अंतरात्म्यातील परमात्म्याला पाहतात. तीर्थंकर स्वतः जिंकतात व इतरांनाही जिंकण्याचा मार्ग दाखवतात. अज्ञानावर विजय मिळवला तर ज्ञानी होतो. आपल्या आतील दुराचार जिंका. म्हणूनच तीर्थंकर जगातील सर्वश्रेष्ठ विजेता आहेत. ते इतरांच्या तुलनेत श्रेष्ठ नाहीत, ते स्वतःच श्रेष्ठ आहेत. ते 'वासरात लंगडी गाय शहाणी' यासारखे नाहीत. अज्ञानाला जिंकून ते ज्ञानी झाले. तुम्ही कोणाला हरवणे सोडून दिले तर तुम्हालाही कोणी हरवणे सोडून देते. तुम्हाला वाटेल की, समोरच्याला हरवल्याशिवाय जिंकू कसे शकतो? पण जेव्हा तुमच्या जिंकण्याने हरणाराही आनंदीत होतो त्याला 'जिंकणे' म्हणतात. ज्याला तुम्ही जिंकले तो तुमचा शत्रू न होता भक्त बनला पाहिजे. आपण जे दिसते तितकेच पाहतो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफजल खानाला भेटण्यापूर्वी त्याचा मनातून नखशिखांत अभ्यास केला होता, त्याला पाहिले होते. म्हणूनच त्यांनी अफजल खानाचा वध केला. कच्चा आंबा असलेली कैरी आंबट लागते. पण पूर्ण पिकलेला आंबा गोड लागतो. भगवान महावीरांची कृपा झाली आणि चंडकौशिकच्या मनातील राग, द्वेष कुठे गेला हे त्याला कळलेच नाही. 'बिना गुरू के घडा पकता नहीं'. आजकाल आपण सहज म्हणतो समोरच्यात संयमच नाही. संयम येण्यासाठी आपल्या आतील सगळे कच्चे पक्के झाले पाहिजे. तुम्ही कच्चे अन्न खाल तर मनही तसेच होईल. तुम्ही एक महिन्यासाठी प्रयोग करा. कच्चे पाणी, कच्चं अन्न खायचे नाही. पहा एक महिन्यानंतर तुमचे मन, काया किती बदलते . पक्की गोष्ट कायम स्थिर असते. पूर्वी घराच्या भिंती कच्च्या होत्या पण नाती पक्की होती. आता नेमके उलटे झाले आहे. पती पत्नी जर आई वडील झाले तर ते प्रमोशन असते. अशावेळी ते कच्चे असतील तर मुलंही कच्चेच होतील. यासाठीच गर्भ संस्कार शिबीर महत्त्वाचे आहेत. मुलांमध्ये संयम तेव्हाच येईल जेव्हा आईवडील कच्चे नसतात. पक्का गुरूच तुम्हाला पक्के बनवतो. माझ्याकडे दिवसभर अनेक जण समस्या घेऊन येतात. मी त्यांना सांगतो, जे तुमच्याकडे येत आहे, त्याचे स्वागत करा. एकदा संयम आला तर तुम्ही स्थिर होताल. तुमचे शरीरच तुमच्या मनाचा आरसा आहे. आतील सगळ्या गाठी काढून टाका. कारण शरीरातील गाठ मनातून येते. आपण मुलांना तीर्थंकर भक्ती शिकवली तर मुलं इतरत्र कुठे जाणार नाहीत.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# अमेरिकेतील ओहायो राज्यातील टोलेडो येथे ढोल व ताशांच्या गजरात गणेश विसर्जन



नगर – अमेरिकेतील ओहायो राज्यातील टोलेडो येथे गणेश विसर्जन सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. ढोल–ताशांच्या गजरात आणि गणरायाच्या जयघोषात भाविकांनी लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. या सोहळ्यामुळे अमेरिकेच्या भूमीवर मराठी संस्कृती आणि गणेशोत्सवाचा उत्साह अनुभवायला मिळाला.

या विसर्जन सोहळ्यात छत्रपती फाउंडेशन अमेरिकेचे उपाध्यक्ष महेंद्र सिनारे, फाउंडेशनच्या युवती अध्यक्षा माधुरी सिनारे तसेच फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. ढोल–ताशांच्या निनादाने परिसर दुमदुमून गेला होता. पारंपरिक पद्धतीने गणरायाची मिरवणूक काढत भाविकांनी भक्तिभावाने विसर्जन सोहळा पूर्ण केला.

यंदाच्या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महेंद्र सिनारे यांचे आई–वडीलही या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यास उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे सिनारे कुटुंबासाठी हा क्षण अधिक भावनिक आणि संस्मरणीय ठरला.

अमेरिकेत वास्तव्यास असतानाही मराठी समाजाने आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ कायम जपली असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून परंपरा आणि संस्कारांची जपणूक केली जात असल्याचे या सोहळ्यातून दिसून आले.

# पावसासाठी श्री विशाल गणेश मंदिरात बाप्पाच्या चरणी साकडे

### बाप्पाच्या चरणी मिळालेला हा मान माझ्या ३५ वर्षांच्या समाजसेवेची पावती : रामदास फुले

नगर – शहराचे आराध्यदैवत श्री विशाल गणेश मंदिरात गणेशोत्सवानिमित्त महाआरती झाली. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष, नेप्ती विभाग सकल माळी समाजाचे अध्यक्ष रामदास फुले यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी अहिल्यानगरसह जिल्ह्यात चांगला पाऊस पडावा, नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न दूर व्हावा, यासाठी श्री विशाल गणरायाच्या चरणी साकडे घातले.

सकल माळी समाज ट्रस्ट व मंदिर ट्रस्टच्या वतीने रामदास फुले यांना महाआरतीचा मान देण्यात आला. आरतीपूर्वी त्यांनी श्रींच्या चरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. सध्या पावसाअभावी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असून अनेक ठिकाणी विहिरींनी तळ गाठला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना त्यांनी बाप्पाच्या चरणी केली.



चांगला पाऊस पडावा यासाठी श्री विशाल गणेश मंदिरात बाप्पाच्या चरणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने साकडे घालण्यात आले.

श्री विशाल गणेश मंदिरात महाआरती करण्याचा मिळालेला मान हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि अविस्मरणीय क्षण आहे. गेल्या ३५ वर्षांच्या सामाजिक प्रवासात समाजातील गोरगरीब, वंचित आणि गरजू घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याचा प्रयत्न केला. या प्रवासात अनेक सन्मान आणि पुरस्कार मिळाले; मात्र श्री विशाल गणरायाच्या चरणी महाआरती करण्याची मिळालेली संधी ही माझ्यासाठी विशेष समाधान देणारी आहे. हा सन्मान केवळ माझा नसून माझ्यासोबत समाजासाठी काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. आज बाप्पाच्या चरणी एकच मागणे आहे, ते म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्यावर कृपादृष्टी ठेवावी. मला हा सन्मान दिल्याबद्दल सकल माळी समाज ट्रस्ट, मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त, पुजारी महाराज आणि सर्व नगरकरांचे आभार मानतो, असे रामदास फुले यांनी सांगितले. आरतीनंतर मंदिर ट्रस्टच्या वतीने रामदास फुले यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# गणेशोत्सवानिमित्त सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विविध स्पर्धांची रंगत

### भक्तिगीत, मेहंदी, टॅटू ड्रॉइंग आणि रील मेकिंगमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले

नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल, तारकपूर येथे गणेशोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या कला–कौशल्याचे सुंदर दर्शन घडविले. इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी भक्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भक्तिमय आणि सुरेल गीतांचे सादरीकरण करून भक्तिरसाने भारावून टाकले. या स्पर्धेसाठी शिक्षिका सीमा कोटस्थाने व राजश्री लांडेगे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.




गणेशोत्सवानिमित्त सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी मुलींची मेहंदी स्पर्धा आणि मुलांची टॅटू ड्रॉइंग स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी कल्पकता, कलात्मकता आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांचा सुंदर आविष्कार आपल्या कलाकृतींतून साकारला. या स्पर्धांसाठी शिक्षिका समीना पटेल व तस्नीम हकीमजीवाला यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गणपती डेकोरेशन रील मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गणपती सजावटीच्या विविध संकल्पना प्रभावीपणे मांडत तंत्रज्ञानाचा सर्जनशील वापर केला. या स्पर्धेचे परीक्षण शिक्षिका प्रियंका मंगलारप व रुचिता सारडा यांनी केले.

या विविध स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या सुप्त कलागुणांना व्यक्त करण्याची संधी मिळाली. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, सर्जनशीलता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या कार्यक्रम समितीच्या प्रमुख तस्नीम हकीमजीवाला यांनी विशेष परिश्रम घेतले. व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सर्व सहकाऱ्यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. शाळेच्या प्राचार्या गीता तांबे विद्यार्थ्यांनी आपल्यामधील भक्तीभाव, कल्पकता, नाविन्य पूर्ण संकल्पना, तंत्रज्ञानाचा सर्वजनशीलतेचा वापर आपल्या आयुष्यात योग्य पद्धतीने करावा यासाठी अशा विविध स्पर्धा घेण्यास त्या नेहमीच प्रोत्साहन देतात.

प्रार्थमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे गणेशोत्सवातील या उपक्रमांना विशेष रंगत आली.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा तसेच विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी आणि हरेश मध्यान यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी आयुष्यात आपल्यातील विविध कलागुणांना वाव देत उज्ज्वल यश मिळवावे असे प्रतिपादन करून विविध स्पर्धामध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित करून शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगर दत्तसंप्रदायातील संत महंतांचे माहेर

### नंदकिशोर आढाव यांचे प्रतिपादन; शिकागोत भारतीय दत्त संप्रदायाची मांदियाळी



शिकागो – अमेरिकेतील शिकागो येथे गेली दोन दशकापासून डॉ. खापेकर दांपत्य प्रत्येक गुरुवारी सायंकाळी आपल्या निवासस्थानी भारतातील विविध भाषिक एकत्र येऊन हिंदू संस्कृतीचा संवर्धन करत दत्तगुरूंची उपासना करतात. गुरुवारच्या उपासनेत दत्त मूर्तीला प्रत्येक जोडप्या तर्फे दुग्ध अभिषेक करताना गायत्री मंत्र, बीज मंत्र, तारक मंत्र, मूलमंत्र, अनुसया मंत्र याशिवाय महामंत्र दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा. डॉ. खापेकर पठण करत यथासांग पूजा करताना भाविक तल्लीन होतात. अनंत चतुर्थीच्या निमित्ताने १००१ मोदकांचा भोग गणेशाला दाखविला गेला.

उपासनेच्या कार्यात सहभागी होताना नंदकिशोर आढाव म्हणाले दत्त संप्रदायातील शंकर महाराज, क्षीरसागर महाराज, महानुभाव पंथाचे चक्रधर स्वामी यांच्या वास्तव्याने अहिल्यानगर ची भूमी पावन झाली आहे याशिवाय जिल्ह्यातील किसनगिरी महाराज, (देवगड), एकनाथ महाराज (पैठण), ज्ञानेश्वर महाराज (नेवासा), साईबाबा (शिर्डी), उपासनी महाराज (साकुरी) आणि नवनाथ (गर्भगिरी) इत्यादी अनेक नामवंत थोर संतांच्या आशीर्वादाने, शिकवणीने जगभरात भक्त निर्माण झाले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांना श्रद्धेने भाविक मोठ्या संख्येने देश विदेशातून दर्शनाला येतात याशिवाय पापाचा गुरु कोण? बोध प्रत कथा सांगत भाविकांना नीतिमत्तेचा संदेश दिला घंटा, शंख ध्वनी, ताल वाद्याच्या स्वरात आरती करत व महाप्रसादाने उपासनेची सांगता झाली.गुरु उपासनेत श्री व सौ. नयना मनोज शेलार, अश्विनी अभिजीत म्हस्के, सोनाली सचिन देशपांडे, मनीषा मंदार पंडित, कुसुम नंदकिशोर आढाव व मुनिष कायस्त, अभय देसाई उपस्थित होते.

